महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ

# गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. ०७ नोव्हेंबर २०२५

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ३ रे | अंक : ३५५ | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com








# पार्थ पवारांचा राजकीय बळी?

## पार्थ पवारांच्या कंपनीचं गौडबंगाल ! चार वर्षांत कमावलेलं उत्पन्न अखेर आलं समोर







**पुणे : (समर्थ गांवकरी)**

कोरेगाव पार्क परिसरातील ३०० कोटी रुपयांचा जमीन खरेदी-विक्रीच्या प्रकरणामुळे चर्चेत आलेल्या अमेडिया होल्डिंग्ज एलएलपी या कंपनीच्या आर्थिक नोंदींमुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार या कंपनीचे भागीदार असून, या कंपनीने गेल्या चार वर्षांत व्यवसायातून एकही रुपया महसुली उत्पन्न मिळविले नसल्याचे कंपनी व्यवहार मंत्रालयाकडील कागदपत्रांनुसार उघड झाले आहे. याचबरोबर इतरही अनेक बाबी समोर आल्या आहेत.

कंपनी व्यवहार मंत्रालयाकडील नोंदींनुसार, या कंपनीची आर्थिक खाती अत्यंत अल्प व्यवहार दर्शवितात. कंपनीने आर्थिक वर्ष २०२१-२२ ते २०२४-२५ या काळात कोणत्याही व्यवसायातून उत्पन्न नोंदवलेले नाही. अर्थविषयक कामकाजात फक्त बँक शुल्क म्हणून ७०८ रुपये इतकीच रक्कम खर्च झाल्याचे दाखवण्यात आले आहे आणि तीच कंपनीच्या तोट्यात नोंदविण्यात आली आहे.

### अनेक प्रश्न उपस्थित

एकीकडे जमीन व्यवहाराची कोट्यवधींची रक्कम आणि दुसरीकडे कंपनीकडे नसलेला महसूल, नगण्य भांडवल आणि मालमत्तेचा पूर्ण अभाव या परस्परविरोधी गोष्टी समोर आल्या आहेत. एवढ्या मोठ्या आर्थिक उलाढालीचा व्यवहार अशा निष्क्रिय कंपनीमार्फत कसा होऊ शकतो, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. माहिती तंत्रज्ञान कंपनी असे कागदोपत्री दाखवण्यात आलेले या कंपनीने आतापर्यंत काहीच काम केले नसल्याचे उघड होत आहे. त्यामुळे बेनामी व्यवहारांसाठी ही कंपनी स्थापन केली गेली का असाही मुद्दा आता उपस्थित झाला आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ अखेर पार्थ पवार आणि त्यांचे मामेभाऊ दिग्विजय पाटील या दोन्ही भागधारकांची भांडवलाची एकूण रक्कम २ लाख ५७ हजार ५६८ रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. पार्थ पवार यांच्या भांडवली खात्यात १.५८ लाख रुपयांची शिल्लक असल्याची नोंद आहे. या कंपनीकडे कोणतीही मालमत्ता नसून, एका खासगी बँकेत २ लाख ४७ हजार रुपये आणि १० हजार रुपये रोकड एवढाच निधी असल्याचा तपशील आहे.

या सर्व आर्थिक नोंदी ३० ऑक्टोबर २०२५ रोजी कंपनीने कंपनी व्यवहार मंत्रालयाकडे दाखल केलेल्या आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या लेखापरीक्षण अहवालात नमूद केल्या आहेत. हा अहवाल चार्टर्ड अकाउंटंट्स ए. व्ही. अय्यर अँड कंपनी यांच्यामार्फत सादर करण्यात आला आहे. मात्र, मंत्रालयाकडील नोंदींमध्ये अमेडिया कंपनीच्या स्थापनेची कागदपत्रे उपलब्ध नाहीत. त्यामुळे ही कंपनी नेमकी कशी आणि कधी स्थापित झाली,

मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची जरूर चौकशी करावी. जेव्हा मुले सज्ञान होतात तेव्हा त्यांचे व्यवसाय करतात. पण, मी कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा इतर कोणाला मदत करा सांगितलेले नाही असा दावाही केला. या पद्धतीचे काहीतरी सुरू असल्याचे माझ्या कानावर आले होते. तेव्हा मी असले काही चुकीचे केलेले चालणार नाही, असा इशारा दिला होता.
**– अजित पवार, उपमुख्यमंत्री**

सुमारे ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्यामुळे अजित पवार हे अडचणीत आले होते. गंभीर आरोपांनंतर पवारांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. पार्थ पवार यांच्या जमीन व्यवहारामुळे अजित पवार हे पुन्हा अडचणीत आले आहेत. मुलाच्या जमीन खरेदीसाठी मुद्रांक शुल्कात सवलत देणे, जमिनीची किंमत कमी करणे हे सारे वित्तमंत्री असलेल्या अजित पवारांना त्रासदायक ठरू शकते.

पुण्यात जैन बोर्डिंगची जागा विकण्यावरून नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा संबंध जोडण्यात आला होता. त्यावरून शिवसेना शिंदे गटाचे नेते रवींद्र धंगेकर यांनी जोरदार आरोप केले होते.

### अजित पवारांनी राजीनामा द्यावा : एकनाथ खडसे यांची मागणी

पार्थ पवार यांच्या कथित जमीन घोटाळा प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मौन बाळगलं आहे. पुण्यातील कोरेगाव पार्कमधील 40 एकर जागा 300 कोटींना पार्थ पवार यांच्या कंपनीनं खरेदी केल्याचा दस्त समोर आला आहे. अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपीनं 1800 कोटी रुपयांची जमीन 300 कोटी रुपयांमध्ये घेतल्याचा दावा करण्यात आला आहे. प्रत्यक्ष ही जमीन शासनाच्या ताब्यात आहे. यामुळं या प्रकरणावर जोरदार चर्चा सुरु आहे. पुण्यातील 40 एकर जमिनीच्या व्यवहार प्रकरणी राज्य सरकारकडून पुण्याचे तहसीलदार सूर्यकांत येवले आणि दुय्यम निबंधक रवींद्र तारु यांना निलंबित करण्यात आलं आहे. राज्य सरकारकडून या प्रकरणी चौकशी समिती देखील स्थापन केली आहे. राज्याचे माजी महसूलमंत्री आणि आमदार एकनाथ खडसे यांनी पुण्यातील जमीन प्रकरणाची चौकशी होईपर्यंत अजित पवार यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली आहे.

- पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने मे २०२५ मध्ये कोरेगाव पार्क येथील ४० एकर जागा खरेदी केली.
- यातील महार वतनदार असलेल्या हक्कदारांनी या जागेसंदर्भातील कुलमुखत्यारपत्र (पॉवर ऑफ अटर्नी) शीतल तेजवानी यांना दिले होते. त्या आधारे अमेडिया कंपनीने ही जागा तेजवानी यांच्याकडून ३०० कोटींना खरेदी केली.
- खरेदीची किंमत साधारण रेडी रेकनरनुसार असली, तरी प्रत्यक्षात कोरेगाव पार्कमधील सध्याच्या भावानुसार जमिनीची किंमत यापेक्षा जास्त असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.
- या कंपनीचे भागभांडवल फक्त एक लाख रुपये आहे.
- प्रत्यक्षात ही जमीन सरकारने १९८८ मध्ये बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडिया या केंद्र सरकारच्या संस्थेला ५० वर्षांच्या भाडेकराराने दिली आहे. कागदपत्रांवर राज्य शासनाचे नाव आहे.
- तेजवानी यांनी अधिकार नसताना जागेची विक्री केली आणि पवार यांनी ती घेतली.
- मूळ मालक असलेल्या वतनदारांच्या वारसांच्या नोंदी अन्य हक्कांमध्ये झाल्याचे कागदोपत्री दिसून येत आहे.
- या जमिनीवर खासगी आयटी पार्क उभारणी करण्यात येणार असल्याचे सांगून २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करून घेण्यात आले आहे.




## संजय राऊत यांचा मतदारसंघ बदलला!

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

मतदार यादीतील नाव असणे हे प्रत्येक नागरिकाच्या मतदानाच्या हक्कासाठी अत्यंत आवश्यक आहे. भारतातील प्रत्येक प्रौढ नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे हे लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्याचे पहिले पाऊल आहे. निवडणूक आयोग वेळोवेळी यादीचे अद्ययावतीकरण करत असतो, ज्यामुळे नवीन मतदारांची नोंद आणि मृत किंवा स्थलांतरित झालेल्या मतदारांची वगळणी केली जाते.

## तलवार, केक आणि इंस्टाग्राम... सोशल मीडियावरील धोकादायक ट्रेंड



**यवतमाळ : (समर्थ गांवकरी)**

सोशल मीडियावर 'स्टाईल' दाखविण्याच्या नादात तरुण पिढी अनेकदा कायद्याचे उल्लंघन करताना दिसते. अशाच एका घटनेत यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव येथे इंस्टाग्रामसाठी तलवारीने वाढदिवसाचा केक कापणाऱ्या तरुणाला पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून धारदार तलवार जप्त करण्यात आली असून ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने केली. अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव वैभव मारोती टेकाम (२४, रा. शांतीनगर, राळेगाव) असे आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अवैध शस्त्रास्त्रांवर विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत पाच ते सहा नोव्हेंबर दरम्यान 'आर्म्स ॲक्ट' अंतर्गत जास्तीत जास्त कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. दरम्यान, ५ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक राळेगाव परिसरात गस्त घालत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वैभव टेकामने वाढदिवसानिमित्त धारदार लोखंडी तलवारीने केक कापल्याचा व्हिडिओ इंस्टाग्रामवर पोस्ट केल्याचे समोर आले. त्यावर तात्काळ कारवाई करत पथकाने त्याच्या शांतीनगर येथील राहत्या घरी छापा टाकून पंचासमक्ष एक धारदार तलवार जप्त केली. याप्रकरणी राळेगाव पोलिसांत भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनात पीएसआय धनराज हाके, सुनिल खंडागळे, सुधीर पिदुरकर, रजनिकांत मडावी आणि सतीश फुके यांच्या पथकाने केली.

## उमेदवारीसाठी इच्छुकांची भाऊगर्दी, ११५० अर्ज

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महापालिका निवडणुकीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एकत्र लढण्याची तयारी केल्यामुळे काँग्रेस दुरावली आहे. परिणामी काँग्रेसमध्ये 'एकला चलो रे'चे वारे वाहू लागले असून निवडणुकीसाठी इच्छुकांचे अर्जही मागविण्यास सुरुवात झाली आहे. स्बळावर निवडणूक लढलो तर महापालिकेच्या २२७ प्रभागांतील कार्यकर्त्यांना संधी मिळणार असल्याने उमेदवारीसाठी अर्जांचाी संख्या वाढू लागली आहे. मुंबई महापालिकेत काँग्रेसने स्वबळावर निवडणूक लढवावी असे वातावरण काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आहे. राज ठाकरे महाविकास आघाडीत आल्यास काँग्रेस बाहेर पडणार असे कार्यकर्त्यांनी गृहीत धरले आहे. त्यात पक्षाकडून इच्छुक उमेदवारांचे अर्जही मागविण्यात येत आहेत. उत्तर मध्य मुंबईतून ३०० हून अधिक अर्ज आले आहेत. तर वायव्य लोकसभा मतदारसंघातून २५० हून अधिक अर्ज आले आहेत. त्याचप्रमाणे अन्य चार लोकसभा मतदारसंघातून १०० ते १५० अर्ज भरण्यात आले असल्याने काँग्रेसमध्ये इच्छुकांची भाऊगर्दी झाली आहे.

## सिंधुदुर्ग स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक

# भाजप-शिंदे गटात 'स्वबळा'ची तयारी

**सावंतवाडी : (समर्थ गांवकरी)**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, वेंगुर्ले, मालवण नगरपरिषद आणि कणकवली नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीमुळे राजकीय वातावरण तापले आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांची 'महायुती' होईल, अशी चर्चा होती. मात्र, आता भाजपने 'स्वबळा'चा नारा दिल्याने जिल्ह्यात भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना अशी तिरंगी लढत होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

भाजपचा निर्धार: 'कमळा'वर निवडणूक! बुधवारी सावंतवाडी येथे झालेल्या भाजपच्या मेळाव्यात पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी स्पष्ट केले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण ताकदीने भाजपच्या चिन्हावर लढवण्याचा पक्षाचा निर्धार आहे. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि पालकमंत्री नितेश राणे हेही उपस्थित होते. पालकमंत्री नितेश राणे यांनीही मैत्रिपूर्ण लढत होईल असे म्हटले आहे.भाजपने स्वबळावर लढण्याचा पवित्रा घेतल्यामुळे महायुतीच्या



चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.

शिंदे गटाची महायुतीची अपेक्षा... पण 'एकला चलो'ची तयारी यापूर्वी शिवसेना (शिंदे गट) चे नेते, उद्योगमंत्री उदय सामंत, आमदार दीपक केसरकर आणि आमदार निलेश राणे यांनी महायुतीसाठी बोलणी करण्याची तयारी दर्शवली होती.आज आमदार दीपक केसरकर यांनी त्यांची भूमिका स्पष्ट करताना म्हटले आहे की, त्यांनी आणि आमदार निलेश राणे यांनी युतीसाठी 'ॲडजेस्टमेंट' करण्याची तयारी ठेवली होती. परंतु, "भाजपला स्वबळावर लढण्याची इच्छा असेल, तर शिवसेनाही (शिंदे गट) स्वबळावर निवडणूक लढवण्यास तयार आहे." यावेळी त्यांनी सावधगिरीचा इशारा देत म्हटले आहे की, जर या दुफळीचा फायदा उबाठा (उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना) गटाला झाला, तर त्याची जबाबदारी भाजपने घ्यावी लागेल.

बंडखोरी रोखण्यासाठी 'मैत्रीपूर्ण' लढत? स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मोठ्या कालावधीनंतर होत असल्यामुळे इच्छुकांची संख्या वाढली आहे. या पार्श्वभूमीवर बंडखोरी रोखण्यासाठी पालकमंत्री नितेश राणे यांनी 'मैत्रीपूर्ण लढत' करण्याचे सुतोवाच केले आहे. तर, आमदार दीपक केसरकर यांनीही 'मैत्रीपूर्ण' किंवा 'स्वबळा' वर निवडणूक झाली तरी, उबाठाला फायदा होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे. आता खासदार नारायण राणे यांची या संपूर्ण प्रकरणातील भूमिका काय असेल, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष यांच्यातील महाविकास आघाडीचा फॉर्मुला अद्याप तरी समोर आलेला नाही. त्यामुळे उध्दव ठाकरे शिवसेना पक्ष ताकदीने लढण्याची शक्यता आहे. काँग्रेस, मनसे, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे म्हणावे तसे प्राबल्य नसल्याने भाजप, शिवसेना शिंदे गट आणि उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेत लढत होईल असे चित्र आहे.






# हास्यास्पद खर्चमर्यादा अन् पैशांची उधळपट्टी



## संपादकीय

राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे आणि सचिव सुरेश काकाणी यांनी पत्रपरिषद घेऊन नगरपरिषद निवडणुकीची घोषणा केली. मतदार याद्यांबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाला विचारायचे प्रश्न काही पत्रकारांनी वाघमारे यांना विचारले. मुळात प्रश्नांची दिशा चुकली होती, तरीही वाघमारेंनी शांतपणे उत्तरे दिली. मात्र, त्यांची फारच भंबेरी उडाल्याच्या बातम्या काही वृत्तवाहिन्यांनी दाखविल्या. वाघमारे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून निवृत्त झाले. ते तसेही अबोल आहेत. कोणी कितीही तावातावात विचारले तरी सौम्य भाषेत सांगण्याचा त्यांचा स्वभाव आजचा नाही; काकाणीही तसेच; पण आता त्यांची भंबेरी उडाली हेच दाखवायचे असेल तर भाग वेगळा. 'आयएएस' म्हणून हयात घालविलेल्या भिडस्त व्यक्तीलाही मीडिया ट्रायलचा फटका बसतो तो असा. तसेही एक-दोन चॅनेल्सनी सुरुवातीला 'राज्य निवडणूक आयोग घेणार आज पत्रपरिषद' ही ब्रेकिंग बातमी देताना लोगो केंद्रीय निवडणूक आयोगाचा दाखवला होता. त्यामुळे दुबार नावांप्रमाणे दुबार चुका टाळण्याची जबाबदारी चॅनेलनी घेतली पाहिजेच.

वाघमारे वर्धा- नागपूरचे, काकाणी अमरावतीचे. निवडणुकांच्या संवेदनशील काळात दोघांकडे महत्त्वाची पदे आहेत. भाजपचे बडे नेते आयोग जणूकाही तेच चालवतात अशा थाटात पक्षाच्या बैठकांमध्ये निक्षून सांगत होते, की निवडणूक ७ नोव्हेंबरला जाहीर होणार आहे. इकडे वाघमारे-काकाणींनी ४ तारखेलाच घोषणा करून टाकली. तिकडे केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुंबईतील मुख्य अधिकारी एस. चोक्कलिंगम तर आणखीच वेगळे रसायन आहेत. पगाराव्यतिरिक्त कमाईचा विचार या माणसाने आयुष्यात केलेला नाही. त्यामुळे आयोग आपल्या खिशात आहे अशा भ्रमात काही सत्तारूढ नेते असतील तर त्यांनी तो भ्रम मनातून काढलेला बरा.



एक काळ असा होता की, महापालिका आणि जिल्हा परिषदांना खूप महत्त्व होते. गेल्या १५ वर्षांमध्ये ते नगरपरिषदांनाही आले. त्याच्या मुळाशी पैसा आहे. विशेषत: देवेंद्र फडणवीस २०१४ ला मुख्यमंत्री झाल्यानंतर गेल्या ११ वर्षांमध्ये नगरपरिषदांना जेवढा निधी मिळाला तेवढा तो आधी कधीही मिळालेला नव्हता. लहान शहरांची देखभाल करणारी संस्था म्हणून नगरपरिषदांची ओळख फडणवीस यांनी बदलवली आणि शहरांचा विकास करणारी संस्था म्हणून लौकिक दिला. त्यामुळे नगरपरिषदांचे अर्थकारण आणि त्याअनुषंगाने राजकारणही बदलले. जकात कर बंद झाला, संपत्ती कर, पाणीपट्टीच्या वसुलीतून येईल, तेवढाच पैसा नगरपरिषदांना मिळायचा आणि त्यातून शहराची देखभाल, दुरुस्तीच तेवढी करता यायची. फडणवीस यांनी ही स्थिती बदलली. एकनाथ शिंदे यांनीही मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात नगरपरिषदांना प्रचंड निधी दिला. कोरोना काळ असल्यामुळे उद्धव ठाकरे यांना तेवढे काही करताच आले नव्हते.

नगरपरिषदांमध्ये पैसा दिसू लागला, मोठाली व्यावसायिक संकुले, क्रीडा संकुले, अभ्यासिका, मोठे रस्ते, पाणीपुरवठ्याच्या योजना, भूमिगत नाल्यांची कामे मोठ्या प्रमाणात झाली आणि त्यानिमित्ताने नगरपरिषदांना व नगराध्यक्ष-नगरसेवकांना आर्थिक अधिकारही आले.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ३०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | 8 | | 2 | 1 | | | 3 |
| | 3 | 6 | | 7 | | | | |
| | | | 3 | | 9 | 6 | | |
| 3 | | | | | 8 | 4 | 2 | |
| 4 | | 5 | 2 | | 7 | 1 | | 6 |
| | 6 | 7 | 1 | | | | | 5 |
| | | 1 | 9 | | 5 | | | |
| | | | | 3 | | 7 | 1 | |
| 6 | | | 7 | 1 | | 5 | 8 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. २९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 1 | 8 | 4 | 3 | 6 | 9 | 2 | 5 |
| 5 | 6 | 9 | 7 | 8 | 2 | 1 | 3 | 4 |
| 2 | 4 | 3 | 1 | 9 | 5 | 8 | 7 | 6 |
| 4 | 8 | 5 | 9 | 6 | 7 | 3 | 1 | 2 |
| 3 | 7 | 2 | 8 | 5 | 1 | 4 | 6 | 9 |
| 6 | 9 | 1 | 3 | 2 | 4 | 7 | 5 | 8 |
| 8 | 2 | 7 | 5 | 4 | 3 | 6 | 9 | 1 |
| 9 | 3 | 6 | 2 | 1 | 8 | 5 | 4 | 7 |
| 1 | 5 | 4 | 6 | 7 | 9 | 2 | 8 | 3 |

### पंचांग

७ नोव्हेंबर २०२५
शुक्रवार
विक्रम संवत्- २०८२
कार्तिक शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- कार्तिक
ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:द्वितीया ११:०५:३६

नक्षत्र:रोहिणी
२४:३३:१७+
योग:परिध २२:२७:०५
करण:गर ११:०५:३६
करण:वणिज २१:१६:१७
सूर्य:तुला

## उपदेशाचे डोस

### विन्रम नेतृत्व

चंद्रावर पहिलं मानवी पाऊल ठेवणारा नील आर्मस्ट्राँग आपल्या सर्वांना माहीत आहे. त्याच्या या कर्तृत्वाबद्दल जगभरातून त्याचे अभिनंदन होत होते. एक अशक्यप्राय वाटणारी घटना सत्यात आल्याने त्या मोहिमेचा नेता नील आर्मस्ट्राँग खचितच कौतुकास पात्र होता. भारतातील डॉ. विक्रम साराभाई यांनी या यशास्वितेबद्दल नील आर्मस्ट्राँगला विचारले 'इतकी मोठी सफलता तुम्ही कशी मिळवली?' नील आर्मस्ट्राँगने उत्तर दिले.' ही सफलता आमच्या अपोलो प्रोग्रॅमची आहे. आमच्या टीममधल्या प्रत्येकाला या मोहिमेचा उद्देश, कार्यपद्धती व अन्य बारीकसारीक तपशील माहीत होता. प्रत्येकाचे काम हे एका मोठ्या योजनेतील महत्वाचा दुवा आहे. याची जाणीव सर्वांना होती. माझ्या एका छोट्याशा चुकीमुळे संपूर्ण मोहीम अयशस्वी होईल हे सर्वांना समजले होते, म्हणून आमच्या अपोलो मोहिमेतील प्रत्येक घटकाने आपापले काम योग्य पद्धतीने केले आणि मोहीम यशस्वी झाली. सफलतेला साऱ्यांचे कष्ट कारणीभूत आहेत, मी तर केवळ निमित्तमात्र आहे. अभिनंदन सर्व चमूचे करायला हवे, माझ्या एकट्याने नव्हे!'

कथा उपदेश : विद्या हेच धन.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५०४ - वर्षभर अमेरिकेत अडकलेला कोलंबस स्पेनला परतला, पुढे सागरप्रवास करणार नाही, असे त्याने जाहीर केले.
- २००६ - ब्रिटन आणि अमेरिकेच्या प्रमुख प्रतिष्ठानांत बॉम्बस्फोट करण्याचा कट रचण्याचा आरोप असलेल्या धीरेन बारोट याला जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली.
- २००८ - ऑस्ट्रेलियाच्या फिरकी गोलंदाज जेसन क्रेझ्झाने कारकिर्दीतल्या पहिल्या कसोटीच्या पहिल्याच डावात आठ बळी घेण्याचा पराक्रम केला.

### राष्ट्रीय

- १८६२ - अखेरचा मुघल बादशहा बहादूरशहा जफर याचा ब्रिटिश कैदेत मृत्यू.
- २००७ - प्रसिद्ध संगितकार ए.आर.रहमान यांच्या द्वारे रोजा चित्रपटासाठी तयार करण्यात आलेल्या संगिताला जगातील प्रसिद्ध टाइम मॅगझीनच्या दहा धुनमध्ये समावेश करण्यात आला.


### जन्म

- १८५८ - बिपिनचंद्र पाल, स्वातंत्र्य चळवळीतील थोर नेते.
- १८६७ - मेरी क्युरी, पोलिश संशोधक.
- १८६८ - मोरे केशव दामले,मराठी व्याकरणकार.
- १८७४ - जोसेफ विलोबी, दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडू.

### निधन

- १९०५ - केशवसुत, कवी.
- १९१० - लिओ टॉल्स्टॉय, रशियन लेखक.
- १९६७ - जॉन गार्नर, अमेरिकेचा उपराष्ट्राध्यक्ष.
- २००० - चिदंबरम् सुब्रमणियम्, भारतीय राजकारणी.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ३०



### आडवे शब्द

३. राख
४. किंचित देखील
७. यादवीत बुडालेली नगर
१०. गीतेतील ज्ञान मराठीत आणणारे
१२. वर्ण
१४. रोटीचे एक धान्य
१५. दह्याचे पाचक पेय
१६. आयुष्यभर
१९. दिवाळीतील 'लक्ष्मी'
२१. दिसायला एकसारखे
२३. स्पष्ट केलेले
२६. वार्धक्य
२८. आयुष्य
२९. पाण्यातील सजीव
३१. वंश
३२. मीठ (हिंदी)
३५. शाश्वत, कायमचे
३६. सलगी
३७. लाकूड कापण्याचे साधन
३९. वादावादी
४०. आजोबा म्हणणारी
४१. पुष्कळ
४३. हेळसांड, दुर्लक्ष
४७. ठाऊक, ज्ञात
५०. मनोरंजन
५२. सामूहिक व्यायाम
५३. गुणांची कदर नसलेला
५५. मियांचा दंडावरचा दागिना
५६. संकट (ला.)
५७. दारू, मद्य
५८. न बोलण्याचे व्रत
६०. नाकारलेले
६२. पार्वती
६३. चार वेदांपैकी एक
६५. रवींद्रनाथांचे काव्य
६७. महिना
६८. कर्ज
६९. भेटवस्तू
७०. ठीक, बेताचा
७१. वर्षाव, सरबत्ती
७२. सरशी
७३. ताठा
७४. सुळका
७६. लाचार, उपकाराच्या ओझ्याला दबलेला
७७. भारतीय बाजारपेठेवर आक्रमण केलेला देश
७९. शत्रू
८०. चोप
८१. भंगूर
८२. उलट
८३. प्रशस्त, पाल्हाळिक

### उभे शब्द

१. खोटा, लटका
२. 'श्यामाची आई'चे लेखक
३. रामाचा एक भाऊ
५. बेडूक
६. क्रोध
८. तरुणी
९. चुलता
१०. राग आणणारे
११. जरब, भीती
१३. दरवाजा, दार
१७. प्रसाद, यज्ञातील आहुती
१८. आठवण (हिंदी)
२०. अमृत
२२. चिंचवड या नदीकाठी आहे
२४. त्वचेवर लावण्याचे औषध
२५. केस
२७. बुधकौशिक रचित स्तोत्र
२९. जयघोष
३०. रौप्य
३१. हुलगे
३३. मिठी
३४. खुमारी, स्वाद
३८. फरक
४०. अनुयायांसाठी आदर्श
४२. ताकद
४४. दमदाटी, दम
४५. सेपे
४६. तीव्र गरज
४७. असफल
४८. लकडा
४९. खुमखुमी
५१. पाठवणी
५४. थर्मामीटरमधील धातू
५६. अवस्था
५९. बुजणारा, संकोची
६०. असंतोष
६१. जंत
६२. कमी महत्त्वाचे
६३. सर्प
६४. जास्त किंमतीचे
६६. लाल
६८. सत्य
६९. उरलेले
७२. खोगीर
७४. अन्नाचा घास
७५. विष
७७. भेग
७८. हे तर दुधातच लपलेले असते
८०. महाशिवरात्रीचा महिना

### शब्दकोडे क्र. २९ चे उत्तर

आडवे उत्तर : १.मृत्युंजय ४.लाभदायक ७.अवास्तव १०.यमन १२.पसायदान १४.मज १५.रसभरीत १८.कावा १९.वहिवाट २१.नरम २२.सदाचार २३.तीन २४.नानकटाई २५.कलम २७.परवा २८.मेषपात्र ३०.जसा भाव तसा ३२.डमरु ३३.भरीत ३४.मलमल ३६.अवसान ३८.पार ३९.दमणी ४१.जनन ४२.सट ४२अ.कोटर ४४.बायको ४५.गरा ४६.विना ४८.दार ४९.रजनीनाथ ५०.कापूर ५१.तुलसीदास ५४.वार्ता ५५.कलह ५६.नमन ५७.करकरीत ५९.नीरज ६१.पावा ६२.डमडम ६४.वसा ६७.कडकडाट ६८.कदम ६९.रसरशीत

उभे उत्तर : १.मृग २.जय ३.यम ५.भरभर ६.कप ७.अदाकार ८.वानवा ९.वर्तमानपत्र ११.नर १३.साम दाम दंड भेद १४.महिना १६.सनई १७.रीम १९अ.वानवसा २०.टक २२.सल २५.कवायत २६.पौष २७.परतपरत २८. मेरुमणी २९.पालम ३१.वर्ज्य ३५.लघुकोन ३६.अजगर ३७.वनराज ३८.पाट ४०.मस्त ४२.सनाथ ४३.टक्कर ४४.बारदान ४६.विनायक ४७.अतुलनीय ४८.दासी ५२.लहर ५३.समस्त ५४.वातड ५७.कवाड ५८.कडक ६०.जवस ६१.पाक ६३.मद ६५.सार ६६.खंत

# जिल्ह्यात मत्स उत्पादन वाढीसाठी विशेष प्रयत्न करावेत

■ मंत्री नितेश राणे



**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिक जिल्ह्यात तलावांची संख्या अधिक असून मत्स उत्पादनासाठी अधिक संधी आहे. त्यासाठी अधिकाऱ्यांनी सुयोग्य नियोजन करून मत्स उत्पादन वाढीसाठी विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना राज्याचे मत्सव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिल्या. नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते गुरुवारी आले असता बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, मत्सव्यवसाय विभाग नाशिकचे प्रादेशिक आयुक्त ना.वि.भादुले, सहाय्यक आयुक्त नाशिक किसन वाघमारे, सहाय्यक आयुक्त जळगाव/ अहिल्यानगर अतुल पाटील, प्रशासकीय अधिकारी अ.कु. शेजूळ, मत्सव्यवसाय विकास अधिकारी (नाशिक) ऋषिकेश ठाकरे, मत्सव्यवसाय विकास अधिकारी (अहिल्यानगर) प्रतिक्षा पाटेकर, सहाय्यक मत्यव्यवसाय विकास अधिकारी अ.सु गवई, अमित स्वामी यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. राणे म्हणाले की, जिल्ह्यात तलावांची संख्या पाहता क्षमतेनुसार मत्सबीज उत्पादनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

यासाठी आधुनिक साधनसामग्रीच्या वापरासह अधिकाऱ्यांनी वेळोवेळी स्थळभेटी देणे गरजेचे आहे. मत्स उत्पादन वाढीच्या दृष्टीने मत्स व्यावसायिक, मत्स संघटना यांना मत्सव्यवसाय विभागाचे शासन निर्णय व योजनांची माहिती होण्यासाठी या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. यासाठी अभ्यास गट तयार करावेत त्यांनी लाभार्थी वाढण्यासाठी ठिकाठिकाणी शिबिरांच्या आयोजनासह योजनांविषयी जनजागृती करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झालेल्या मत्सव्यावसायिकांचे नुकसानीचे पंचनामे करून मदत पुर्नवसन बाबतचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत.

नाशिक शहरात सुसज्ज मच्छी बाजार उभारणीसाठी महानगरपालिकेच्या समन्वयातून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही मंत्री राणे यांनी बैठकीत दिल्या.



राजूर : पाणी आडवा,पाणी जीरवा,निसर्ग वाचवा. निसर्गाचे संवर्धन करा. प्राणी मात्रांची काळजी घ्या.या उक्तीप्रमाणे अकोले तालुक्यातील राजूर पासून पश्चिमेस काही अंतरावर असणाऱ्या ग्रामीण डोंगराळ भाग म्हणून ओळख असलेल्या माळेगाव येथे श्रमदानातून वनराई बंधारा उभारण्यात आला आहे.लोकसहभागातून जलस्रोत बळकटीकरणाचा उपक्रम कृषी विभागामार्फत येथील ग्रामस्थांनी हाती घेतला आहे.जलस्त्रोत संवर्धनासाठी ग्रामस्थांच्या श्रमदानातून वनराई बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली आहे.

## थोडक्यात बातम्या...



### खतोडे व मंडलिक यांना जीवन गौरव पुरस्कार

गणोरे (स. गांवकरी) : ग्राहक पंचायत , गणोरे यथील ग्राहक पंचायत चे ज्येष्ठ सदस्य सखाराम खतोडे ,यांचा ग्राहक पंचायत महाराष्ट्र नाशिक विभाग यांच्यातर्फे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नंदुरबार जिल्हातील तळोदा येथेही नाशिक विभागीय ग्राहक पंचायतीचा नुकताच अभ्यास वर्ग संपन्न झाला. आमदार पाडवी यांच्या हस्ते या अभ्यास वर्गाचे उद्घाटन करण्यात आले. ग्राहक पंचायत चे राज्य अध्यक्ष डॉ विजयजी लाड यांचे सह राज्यातील अहिल्यानगर ,नाशिक, धुळे, नंदुरबार ,जळगाव, जिल्ह्यातील ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वामी विवेकानंदाच्या प्रतिमेचे पुजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. राज्य ग्राहक पंचायतीचे कामा संदर्भात धाराशिव येथील मेधाताई कुलकर्णी व अहिल्यानगरचे जिल्हा संघटक प्रा डॉ राजेंद्र कळमकर यांनी माहिती दिली. यावेळी खतोडे यांनी ग्राहक पंचायती माध्यमातुन दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना सन्मान पत्र देऊन जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तळोदा येथील प्रा. जयपाल सिंह शिंदे, भुसावळ येथील संजयजी शुक्ला, अँड, सुरेंद्र जी सोनवणे,अरुण वाघमारे, रणजीत श्रीगोड, प्रा. चंद्रकांत डागा, पी झेड कुवर, चंद्रकांत योशिराव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### बिलोली पालिका मुख्याधिकारी पदी गंधाली पवार रुजू




नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : बिलोली नगरपालिका मुख्याधिकारी पदी गंधाली जगदिश पवार या रुजू झाले आहेत.यापुर्वी त्यांनी नायगाव नगरपंचायत येथे मुख्याधिकारी म्हणून काम पाहिले आहे .बिलोली नगरपालिकेच्या निवडणुका लागल्या मुळे येथे पुर्णवेळ मुख्याधिकारी असावा अशी मागणी होती त्याची दखल घेत शासनाने त्यांची नियुक्ती केली असून आज प्रथम समयी रुजू झाल्या असून प्रभारी मुख्याधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार बालाजी मिठ्ठेवाड यांच्या कडून पदभार स्वीकारला आहे.

### सगरोळी पंचायत समिती गणातून भाजपाकडून रवी मुत्येपोड इच्छुक

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : राज्यातील आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक २०२५ करिता गट व गण निहाय आरक्षण निश्चित झाले असून लवकरच बिगुल वाजणार आहे. पण याआधी इच्छुकांची भाऊगर्दी होताना दिसून येत आहे. बिलोली तालुक्यातील सगरोळी पंचायत समिती गण हा अनूसुचित जमातीसाठी आरक्षित झाला असून या गणातून सगरोळी येथील उच्चशिक्षित भाजपाचे कट्टर समर्थक रवी सायन्ना मुत्येपोड हे भाजपकडून निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याचे बोलल्या जात आहे. तालुक्यातील ग्रामीण भागाचे मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या पंचायत समितीवर जवळपास चार वर्षापासून प्रशासक लागू आहे. यामुळे ग्रामीण भागाची अनेक कामे खोळंबली गेली आहेत. चार वर्षाच्या प्रतीक्षेनंतर आता या मिनी मंत्रालयाला शासनराज येणार आहे. म्हणून याकरिता जनतेतुन लोकप्रतिनिधी निवडल्या जाऊन यातून जिल्हा परिषद गटातून जिल्हा परिषद अध्यक्ष तर गणातून पंचायत समिती सभापती निवडल्या जाणार आहे. याकरिता निवडणूक आयोगाकडून जिल्हा परिषद व पंचायत समितीचे आरक्षण जाहीर केले. नगर परिषद, नगर पंचायत निवडणुकी तद्नंतर जि.प. पं स. च्या निवडणुका लागणार आहे.

### जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे घवघवीत यश



नायगाव (स. गांवकरी) : तालुक्यातील बरबडा येथील नाव लैवकीक असलेल्या बरबडा येथील लातूर येथे संपन्न झालेल्या असलेल्या विभागीय स्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धे मध्ये जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बरबडा येथील १७ वर्षाखालील विकास शिवाजी शिंदे हा विद्यार्थी गोळा फेक स्पर्धेत मध्ये प्रथम आला आहे व तसेच लांब उडी स्पर्धेत १७ वर्षाखालील कुमारी दुर्गा गंगाधर चन्ने ही विद्यार्थिनी द्वितीय क्रमांक आल्या बद्दल संस्थेचे अध्यक्ष व माजी जिल्हा अध्यक्ष. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नांदेड दिलीपराव धर्माधिकारी बरबडेकर, संस्थेचे उपाध्यक्ष सदाशिवराव धर्माधिकारी बरबडेकर, संस्थेचे संचालक तथा माजी प्राचार्य सुरेवाड सर, शिवाजीराव धर्माधिकारी बरबडेकर, बरबडा नगरीचे उप सरपंच व पंचायत समिती सदस्य सौ.छायाताई दिलीपराव धर्माधिकारी,जगदीशराव धर्माधिकारी, संस्थेचे सहसचिव तथा प्राचार्य सुदर्शन धर्माधिकारी, शाळेचे उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, माजी मुख्याध्यापक, ज्यूनीअर कॉलेजचे पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षेकेत्तर कर्मचारी यांनी खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक क्रीडा शिक्षक कैलास पवार सर यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पिंपरखेड, तालुका- शिरूर येथे थेट ग्रामस्थांशी भेट

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील पिंपरखेड गावातील रोहन विलास बोंबे या १३ वर्षीय चिमुकल्याचा काही दिवसांपूर्वी बिबट्याच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला होता. तसेच पिंपरखेड येथील कु.शिवन्या शैलेश बोंबे व जांबुत येथील श्रीमती भागूबाई जाधव या आजींचाही याच पंधरवड्यात मृत्यू झाला होता. या घटनेमुळे मंचर येथे पुणे नाशिक महामार्गावर तब्बल अठरा तास महामार्ग रोखून ग्रामस्थांनी आंदोलन केले होते. राज्य सरकारचे वनमंत्री, पालकमंत्री व स्थानिक आमदार घटनास्थळी उपस्थित न राहिल्याने जनतेत आक्रोश होता.

आज पुणे दौऱ्यावर असताना महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा.ना. एकनाथजी शिंदे साहेब यांनी पिंपरखेड येथे भेट देऊन मृत मुलाच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले





तसेच परिसरातील ग्रामस्थांशी प्रत्यक्ष संवाद साधून बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांबाबत सविस्तर माहिती घेतली. बोंबे यांच्या घराकडे जाणारा रस्ता नसल्याने त्यांनी एक किलोमीटर शेतातून पायी जात या कुटुंबीयांची भेट घेतली व या रस्त्याच्या दुरावस्थेबाबत संबंधित विभागाला पक्का रस्ता उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या.

साहेबांनी ग्रामस्थांच्या भावना ऐकून घेताना सांगितले की,"बिबट्यांचा नागरी वस्तीमध्ये वाढलेला वावर आणि माणसांवरील वाढते हल्ले ही गंभीर बाब आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राज्य सरकार ठोस व तातडीची पावले उचलेल. बिबट्यांना पकडून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याची मोहीम सुरू आहे आणि आता तातडीने ही मोहीम व्यापक करून या भागातील सर्व बिबटे पकडून त्यांना स्थलांतरित करावेत असे वनविभागाच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश दिले.

सध्या शिरूर, जुन्नर, आंबेगाव व खेड तालुक्यात बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. वन विभागाकडून पिंजरे लावून बिबट्यांना पकडण्याचे प्रयत्न सुरू असून, थर्मल कॅमेरे, ड्रोन सर्व्हे, आणि नाईट पॅट्रोलिंग यासारख्या उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश साहेबांनी दिले. तसेच, बिबट हल्ल्यांमध्ये मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबियांना शासनस्तरावरून योग्य आर्थिक सहाय्य मिळेल याची खात्री देण्यात आली. तसेच मृत्युमुखी पडलेल्या रोहन विलास बोंबे यांच्या घराची अवस्था पाहून त्यांना घर बांधून देणार असल्याचे सांगितले.

या प्रसंगी शिवसेना सचिव रामभाऊ रेपाळे, जुन्नरचे आमदार शरददादा सोनवणे, माजी आमदार पोपटराव गावडे, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन देवदत्त निकम, शिवसेना जिल्हाप्रमुख देविदास दरेकर, युवासेना कार्यकारिणी सदस्य सचिन बांगर, शिवसेना नेते रमेश येवले, सरपंच रविंद्र वळसे पाटील, माजी सरपंच नरेश ढोमे, पिंपरखेडचे उपसरपंच विकास वरे, शेतकरी संघटनेचे माऊली ढोमे, किरण ढोबळे, श्रीकांत लोखंडे, तसेच वन विभागाचे अधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबांच्या भेटीमुळे ग्रामस्थांमध्ये विश्वास आणि आश्वस्ततेचे वातावरण निर्माण झाले असून, लवकरच या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# पोलिस अधिकारी अजय गव्हाणे यांचे अपघाती निधन

**आंबेगाव : (समर्थ गांवकरी)**

बुधवार दि. 5 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास मुंबई येथे कार्यरत असलेले पोलिस अधिकारी अजय नथुराम गव्हाणे (वय 41) यांचे दुर्दैवी अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने गव्हाणे परिवार, नातेवाईक तसेच मित्रपरिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. श्री. अजय गव्हाणे हे कर्तव्यदक्ष व प्रामाणिक अधिकारी म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या अकाली जाण्याने पोलिस दलासह समाजात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिवावर आज गुरुवार दि. 6 नोव्हेंबर रोजी सकाळी 9 वाजता सालसिद्धेश्वर वैकुंठधाम, सालगाव (ता. आंबेगाव) येथे घोडेगाव पोलीस स्टेशन चे पोलीस अधिकारी यांच्या कडून शासकीय इतमामात मानवंदना देऊन अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. ग्रामस्थ, नातेवाईक आणि



मित्रपरिवार यांनी या घटनेबद्दल गव्हाणे परिवाराला धैर्य मिळावे म्हणून ईश्वर चरणी प्रार्थना केली असून शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. त्यांच्या पश्चात त्यांचे कुटुंबीय वसंत मारुती गव्हाणे, प्रभाकर मारुती गव्हाणे, विष्णू मारुती गव्हाणे, नाथा विठ्ठल गव्हाणे, गणेश किसन गव्हाणे, रोहिदास तुकाराम गव्हाणे, मनोहर ज्ञानेश्वर गव्हाणे तसेच गव्हाणे पाटीलवाडा भाऊबंद मंडळ, ग्रामस्थ व नातेवाईक व आप्तेष्ट यांना दुःख सहन करण्याची शक्ती देवो हीच प्रार्थना त्यांच्या मागे 2 मुली व पत्नी असा परिवार आहे पहाडी शेर या वृत्तपत्र समूहाचे संपादक प्रभाकर गव्हाणे यांचे ते पुतणे होते.

# राहेरला तीर्थ क्षेत्राचा 'अ' दर्जा मिळवून देणार : खा. अशोकराव चव्हाण

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

श्री संत बाळगीर महाराज यांची जन्मभूमी श्रीक्षेत्र राहेर तीर्थ क्षेत्राला 'अ' दर्जा मिळाला पाहिजे यासाठी आपण वरिष्ठ पातळीवर प्रयत्न करित असुन या परिसराच्या विकास कामासाठी निधीची कमतरता पडणार नाही. नाशिकला २०२७ मध्ये कुंभमेळा संपन्न झाले नंतर २०२८ ला राहेर येथील संत सदगुरू समर्थ बाळगीर महाराज जन्म भूमिवर कुंभमेळा व हिंदू धर्म जनजागृतीचा मोठा घाट माहुर वडगुंफा येथील संत शिरोमणी श्री.श्री.श्री. १००८ अष्ट कौशल्य सन्मानित सदगुरू समर्थ नारायणगीरी गुरू बाळगीर महाराज यानुघातला आहे. यामुळे येथे देशभरातील संत महंत मंडळी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होणार आहे. नाशिक कुंभमेळ्याच्या धर्तीवर हा कुंभमेळा येथे संपन्न होणार आहे. यासाठी आपण सर्वजण मिळून कुंभमेळा यशस्वी करु, असे मत माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण यांनी व्यक्त केले आहे. दि.३ नोव्हेंबर सोमवारी रोजी




तालुक्यातील राहेर येथील संत निवास इमारतीचे भूमिपूजन खा. अशोक चव्हाण यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री दत्त मंदिर मठ संस्थान पिंपळगाव येथील सद्धर्म शिरोमणी गोवत्स श्री बालयोगी व्यंकट स्वामी महाराज हे होते. तसेच श्रीक्षेत्र माहुर वडगुंफा मठाचे मठाधिपती श्री.श्री.श्री. १००८ अष्ट कौशल्य सन्मानित महंत सदगुरू समर्थ नारायणगीरी गुरू बाळगीर महाराज, कोलंबी मठ संस्थानचे महंत १०८ यदुबन महाराज कोलंबीकर, संत श्याम भारती महाराज माहूर, येवती मठाचे संत श्री. नराश्याम महाराज, संत आनंदपुरी गुरुदत्तपुरी महाराज, संत कृष्णराज बाबा खामणेकर , संत योगीराज बापू, नायगाव मठाचे संत श्री. सरोजगीरी माता, नांदेड राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे, पुनम पवार, राजेश देशमुख कुंटूरकर, गोविंदराव शिंदे नागेलीकर, मारोतराव कवळे, श्रावण पाटील भिलवंडे, लक्ष्मणराव ठक्करवाड, माणिक लोहगावे, सुर्याजी चाडकर, अमोल ढगे, रमेश पारसेवार, अदींसह हजयांची उपस्थिती होती खा. अशोक चव्हाण पुढे बोलताना म्हणाले की, येथील संत निवास हे ज्ञानाचे मंदिर असणार आहे. ते एक जिल्ह्यातील पवित्र धार्मिक स्थळ राहील. या तीर्थक्षेत्राला 'अ' तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देण्यासाठी आपण स्थानिक आमदारांसोबत लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार आहोत.

महाराष्ट्रातील जनता ही देवाला संत महंतांना माननारी आहे मी देखील भाविक आहे. असे ही ते म्हणाले. शहादत्त अवतार सदगुरू समर्थ बाळगीर महाराज जन्मभुमी देवस्थान तीर्थक्षेत्र राहेर येथील विकास कामासाठी मी माझ्या निधीतून दरवर्षी २५ लक्ष निधी देणार असल्याचे नांदेड लोकसभा खा. रविंद्र चव्हाण यांनी संत भुमीपुजन सोहळ्याचे उद्घाटक येण्याआधी ठरलेल्या अगदी वेळेवर येऊन उपस्थित राहुन या कुंभमेळा कार्यक्रमास व देवस्थानास जमेल ते सहकार्य करणार असल्याचे उपस्थित सर्व संत, महंत व भाविकां समक्ष सांगितले.

# सेवानिवृत्त मुख्याध्यापक गोपीनाथ हाडवळे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील मुळा परिसरातील लिंगेश्वर आदर्श विद्यालय येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक गोपीनाथ निवृत्ती हाडवळे यांचा सेवापूर्ती सोहळा उद्या शनिवार दिनांक 8 /11/ 2025 रोजी सकाळी दहा वाजता लिंगेश्वर विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महीला गृह उद्योग लिज्जत पापडचे कार्यकारी संचालक सुरेशराव कोते नाना.महाराष्ट्र शासनाचे अधिकारी राजेंद्र रहाणे हे भुषविणार असुन प्रमुख पाहुणे अकोले विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार डॉक्टर किरणजी लहामटे संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोलजी खताळ नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे. आदिवासी विकास महामंडळाचे संचालक तथा माजी आमदार वैभवराव पिचड आदी उपस्थित राहणार आहेत तरी या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर अहमदनगर जिल्हा परिषदेच्या



माजी अध्यक्ष शालिनीताई विखे मुंबई महानगरपालिकेचे गार्डन सुपरटेंड विजय हिरे. आयडीबीआय बँकेचे व्यवस्थापक श्रीमती प्रेम लताताई हिरे. नरेश फाउंडेशनचे सचिव लक्ष्मण गोरडे.कै. रामदास नायक सर्व सेवा संघ लिंगदेव संस्थेचे अध्यक्ष भास्कर फापाळे संचालक कारभारी जाधव सर भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस सिताराम भांगरे सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सुनीताताई मुंदडा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉक्टर विश्वास आरोटे. सेवानिवृत्त मुख्याध्यापक विलास महाले विस्ताराधिकारी संभाजी झावरे. अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शरद चौधरी. कृषी अधिकारी तुळशीराम चौधरी. मैत्रेय ट्रॅव्हलचे संचालक भाऊसाहेब घोमल. संगमनेरचे नामवंत उद्योजक नारायण इटप. ऋषिकेश हाडवळे आकुर्डी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अरविंद कुमावत पोलीस निरीक्षक अजय कोटे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष विनायक धुमाळ. मुळा ग्रामीण शिक्षण संस्थेचे सचिव दगडूशे अण्णासाहेब सावंत भागवत घोमल रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष विद्याचंद्र सातपुते. हरिभाऊ फापाळे. ग्रामपंचायतचे सरपंच अमित घोमल. लहीत ग्रामपंचायतचे सरपंच मंगल चौधरी. सावरचोळ ग्रामपंचायतच्या सरपंच अनिता कानवडे. लिंगेश्वर पतसंस्थेचे अध्यक्ष प्रभाकर फापाळे. लिंगेश्वर वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सचिन महाराज चौधरी. मुख्याध्यापक संघाचे तालुकाध्यक्ष सुनील धुमाळ. मुख्याध्यापक रावसाहेब वालेकर विक्रम गोरडे भिमाशंकर हांडे संजय कडलक किरण भागवत श्याम मालुंजकर अनिल मंडलिक संजय उकिरडे. लिंगेश्वर देवस्थानचे विश्वस्त रामकृष्ण कानवडे मंगेश पापाळे.मुख्याध्याप संघटनेचे तालुका सचिव तु रा कानवडे. रामदास शिंगोटे पोपट कदम. अनिल कातोरे भाऊसाहेब गोडसे किसन काळे राजेंद्र गवंदे. पांडुरंग लांडगे . विनायक फटांगरे. भाऊ पाटील कानवडे गणेश पवार सदाशिव कानवडे कामगार पोलीस पाटील मंगल पवार. ज्ञानेश्वर भांगरे श्रीमती रूपाली कुलकर्णी माधव चौधरी अण्णासाहेब ढगे माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक किशोर धुमाळ प्रगतशील शेतकरी जालिंदर बोराडे रामनाथ चौधरी कैलास पावशे सोमनाथ खराटे रणजीत हासे सतीश तोरकडी पोपट हाडवळे शरद कानवडे राजेंद्र आढाव वसंत हडवळे नारायण चौधरी लव कोल्हार भास्कर कानवडे माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक सुधीर कानवडे लहानु चौधरी शांताराम चौधरी सचिन निर्मळ सौरभ पवार भाऊसाहेब हरवले प्रल्हाद देशमुख शिक्षकेतर संघटनेचे जिल्हाध्यक्ष भीमाशंकर तोरमल डॉक्टर तुषार गावडे कैलास फापाळे आदी मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित राहणार असून तरी तालुक्यातील शिक्षण प्रेमी व पालक वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान लिंगेश्वर आदर्श विद्यालय या संस्थेच्या संचालक व शिक्षक व कर्मचारी वर्गाने केले आहे.

ज्यांनी आपलं आयुष्य शिक्षणासाठी विनाअनुदान तत्त्वावर सुरू असलेल्या एका शिक्षण संस्थेत सुरू केले मात्र तेथे मन रमले नाही त्यांनी आपल्याच गावातील व परिसरातील मुलांसाठी ज्यांनी शाळा सुरू झाल्यापासून ते आत्तापर्यंत आपल्या पगारातील व सहकारी असणारे शिक्षक यांचा सहभाग घेऊन या ठिकाणी या शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक यांनी पगारातील रक्कम विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च केले वर्षातील बारा महिन्यापैकी चार पगार विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी योगदान देणारे या लिंगेश्वर विद्यालयातील शिक्षकांचा एक आदर्श मुख्याध्यापक म्हणून आज सेवानिवृत्त होत असताना जरी मी येथे नसलो तरी या विद्यालयात येणारे उद्याचे विद्यार्थी यांच्या सुख सुविधा निर्माण करण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न करणारे गोपीनाथ हाडवळे व त्यांचे सर्व सहकारी यांचा आदर्श इतर शिक्षण संस्था चालक व शिक्षकांनी घेतला तर नक्कीच ग्रामीण भागातील शाळा या नक्कीच निकाल व शैक्षणिक धोरण शासनावर अवलंबून न राहता या विद्यालयातील विद्यार्थी हेच आपले खरे दैवत मानून लिंगेश्वर पॅटर्न राबविला तर नक्कीच वावगे ठरणार नाही असे कार्य या शिक्षकांनी केले आहे सेवानिवृत्त झालो तरी शाळा आमची आम्ही शाळेचे आमची ओळख या शाळेने निर्माण केली या शाळेला दातृत्व कमी असले तरी शिक्षकांनी केलेले दातृत्व हे नक्कीच प्रेरणादायी ठरेल अशी माजी विद्यार्थी व पालक वर्गांमधून या शिक्षकांना एक प्रेरणा ठरणार आहे.

# विकास कामांचा मी गॅरेंटर राहीन : खा. अशोकराव चव्हाण

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका संदर्भात धनेगाव सर्कलचे माजी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना मी तुम्हाला असा उमेदवार देईन की तुमची तक्रार माझ्याकडे कधीच येणार नाही. या बाबीचा गॅरेंटर मी अशोक चव्हाण असणार. दक्षिण मतदार संघातील चार पंचायत समिती आणि आठ गण येथे येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका यामध्ये भाजपच्या उमेदवारांना बहुमताने निवडून द्या तुमचा कुठल्याही विकास कामांची तक्रार येऊ देणार नाही असे मत अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केले. यावेळी पुढे बोलताना अशोकराव चव्हाण म्हणाले की धनेगाव गावाशी आत्मीयतेचे नाते असुन ते मी जपलेले आहे . धनेगाव सर्कल मधून कोणताही उमेदवार दिल्यास तो कमळ या उमेदवाराचा विजय होईल अशी ग्वाही माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी जनसंपर्क कार्यालय ऊध्दाटन प्रसंगी मत व्यक्त केले. यावेळी माजी जि.प.सदस्य मनोहर पाटील शिंदे धनेगावकर यांच्या भव्य जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी भाजपा महानगर अध्यक्ष अमर भाऊ राजुरकर , माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे, युवा नेते संजय पाटील घोगरे,नांदेड दक्षिण विधानसभा प्रमुख डॉ.सचिन ऊमरेकर,सरचिटणीस शितल खंडील,सरपंच साहेबराव सेलुकर, पुंडलिक मस्के,माजी नगरसेवक संजय इंगेवाड, श्रीनिवास जाधव ,राजु पाटील काळे,रमेश तालीमकर,शेख गफुर,तातेराव ढवळे, भागवत शिंदे, शैलेंद्र ठाकूर, मारोती तळणे,चिमणाजी कदम,यांच्या सह बळीरामपुर,वाजेगाव,धनेगाव सर्कल मधील महिला युवक जेष्ठ नागरिक सह भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी अमर भाऊ राजुरकर यांच्यासह दक्षिण तालुका अध्यक्ष विश्वाभंर शिंदे,डॉ.सचिन ऊमरेकर व युवानेते संजय पाटील घोगरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी केले तर सूत्रसंचालन रमेश वाघमारे व दिगंबर शिंदे यांनी केले . हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी धान्यगाव नगरीचे सरपंच पिंटू पाटील शिंदे व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.



किनवट : तेलंगणा राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातही सोयाबीन, तूर, हरभरा, गहू, कापूस, मका आदी शेतमालाची खरेदी गाव पातळीवर करावी, या मागणीचे निवेदन शरद जोशी प्रणित शेतकरी संघटना, प्रहार जनशक्ती पक्ष, अखिल भारतीय किसान सभा व किनवट तालुक्यातील विविध शेतकरी आघाड्यांच्या वतीने विभागीय अधिकारी झेनिथ दोनतुल्ला यांना देण्यात आले. शेतकऱ्यांना खरेदी केंद्रावर जाण्यासाठी बारदाना, वाहतूक, हमाली आदींचा सुमारे २०० रुपये प्रति क्विंटल खर्च होतो. त्यात तुट, लूट व छळ यामुळे शेतकरी अधिकच त्रस्त होत आहेत. अतिवृष्टी, वाढते उत्पादनखर्च आणि आर्थिक अडचणी यामुळे गाव पातळीवरच खरेदी करण्याची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## थोडक्यात बातम्या...




### सावरगाव काचळवाडी येथे बिबट्या जेरबंद; पिंजरे लावण्याची मागणी

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : सावरगाव कासरवाडी येथे बिबट्या जेरबंद झाला परंतु अजूनही दोन व्यक्ती काचळवाडी मध्येआहे नागरिकांनी पुन्हा पिंजरा लावण्याची मागणी केली आहे.रात्री अडीच वाजण्याच्या सुमारास बिबट्या पिंजऱ्यामध्ये जेरबंद झाला परंतु बाहेर असलेल्या दोन बिबटे पिंजऱ्याला येऊन धक्का मारत होते.हे सारे दृश्य काचवडीच्या ग्रामस्थांनी स्वतःडोळ्यांनी पाहिलेले आहेत म्हणून प्रशासनाला पुन्हा विनंती आहे की पुन्हा काचळवाडी मध्ये पिंजरा लावण्यात यावा अशी नम्रतेची विनंती व ग्रामपंचायत सावरगाव यांना देखील विनंती आहे की लाईटची व्यवस्था लवकरात लवकर करावी. कोणत्याही क्षणी बिबट्या हल्ला करू शकतो म्हणून ग्रामपंचायतीला विनंती आहे की लवकरात लवकर लाईटची व्यवस्था करावी अशी नागरिकांनी मागणी केली आहे. घटनास्थळी आपदा मित्र सुशांत भुजबळ,वनरक्षक बनसोडे पोलीस पाटील रुपेश जाधव, ग्रामस्थ माऊली काचळे,रामदास नायकोडी, भानुदास काचळे, कमल महाले, संदेश काचळे आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस पाटील यांनी वन अधिकाऱ्यांची संपर्क साधून पिंजऱ्यात जेरबंद झालेल्या बिबट्याला घेऊन जाण्यास सांगितले आणि आजच्या आजच दुसरा पिंजरा लावण्यास सांगितले आहे.

### ग्रामपंचायत नारायणगाव व लायन्स क्लब यांच्यावतीने गंगाआरती संपन्न!

नारायणगाव (स. गांवकरी) : ग्रामपंचायत नारायणगाव व लायन्स क्लब ऑफ जुन्नर शिवनेरी यांच्या वतीने त्रिपुरापौर्णिमा निमित्त मीनानदीच्या तिरावर गंगाआरती संपन्न झाली. नारायणगाव व वारूळवाडीतील महिल्या मोठ्या संख्येने या आरतीसाठी उपस्थित होत्या. यावेळी सरपंच डॉ. शुभदा वाव्हळ, मीना गायकवाड, अंजली खैरे, लायन्स क्लबचे अध्यक्ष मंडलिक यांनी उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. सुनील मेहेर व त्यांच्या सहकाऱ्यांनी भावगीतांचा कार्यक्रम सादर केला. शरद दरेकर यांनी प्रास्ताविक केले. ग्रामपंचायत सदस्य हेमंत कोल्हे व अजित वाजगे यांनी सूत्रसंचालन केले. तर नेहा योगेश पाटे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन संतोष वाजगे,दीपक वारुळे, अजय चोरडिया,अनिलतात्या दिवटे,संजय गुंजाळ,संपत शिंदे,नंदकुमार अडसरे, ग्रामपंचायत सदस्य आरिफभाई आतार, गणेश पाटे, संतोष दांगट,भावना बेल्हेकर,लायन्स क्लबचे सदस्य व ग्रामपंचायत कर्मचारी यांनी केले.



### 'ॲप्पल म्युझिक'चा मोफत आनंद चार महिन्यांपर्यंत फ्री सबस्क्रिप्शनची ऑफर

पुणे (स. गांवकरी) : टाटा प्लेने आपल्या ग्राहकांसाठी मनोरंजनाचा अनुभव आणखी समृद्ध करण्यासाठी 'ॲप्पल म्युझिक'ची विशेष प्रमोशनल ऑफर लाँच केली आहे. या ऑफरअंतर्गत टाटा प्ले बिंज, टाटा प्ले मोबाइल ॲप आणि टाटा प्ले फायबरचे सबस्क्रायबर्स ॲप्पल म्युझिकचा आनंद घेऊ शकतात. या अंतर्गत नवीन वापरकर्त्यांना चार महिन्यांचे मोफत सबस्क्रिप्शन, तर पात्र परत येणाऱ्या वापरकर्त्यांना तीन महिन्यांची मोफत ट्रायलमिळणार आहे. या प्लॅटफॉर्मवर 100 दशलक्षांहून अधिक गाणी, उत्कृष्ट प्लेलिस्ट्स आणि लाईव्ह रेडिओ उपलब्ध असेल. टाटा प्लेच्या चीफ कमर्शियल अँड कंटेंट ऑफिसर पल्लवी पुरी म्हणाल्या, "आम्ही आमच्या सबस्क्रायबर्सचा मनोरंजन अनुभव अधिक आकर्षक करण्यासाठी सतत नवकल्पना आणत आहोत. या प्रमोशनल ऑफरमुळे ग्राहकांना अधिक मूल्य, सोयीसुविधा आणि 'ॲप्पल म्युझिक'च्या माध्यमातून जागतिक दर्जाचा संगीत अनुभव देण्याची आमची वचनबद्धता अधोरेखित होते." ॲप्पल इंडियाच्या कंटेंट अँड सर्व्हिसेस डायरेक्टर शालिनी पोद्दार यांनी सांगितले, "टाटा प्लेसोबत आमचा सहयोग विस्तारण्याचे हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या एकीकरणामुळे टाटा प्लेच्या ग्राहकांना अधिक वैयक्तिकृत आणि दर्जेदार ऑडिओ अनुभव मिळेल." या ऑफरचा लाभ ग्राहक प्रोमो कोड रिडेम्प्शनद्वारे घेऊ शकतात. ट्रायल कालावधी संपल्यानंतर ही सेवा दरमहा फक्त 119 मध्ये उपलब्ध राहील.

# १४ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात होणार प्रदर्शित 'रील स्टार'

**'रील स्टार'चा अनोखा, संघर्षमय, प्रेरणादायी प्रवास रुपेरी पडद्यावर**

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**




काही चित्रपट मनोरंजनाच्या माध्यमातून वास्तव जीवनाचे यथार्थ दर्शन घडवत अंतर्मुख करतात. त्यापैकीच एक असलेल्या 'रील स्टार' या आगामी मराठी चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण केली आहे. ट्रेलर प्रदर्शित झाल्यापासून या चित्रपटाबाबतचे कुतूहल अधिक वाढले असून, संगीत प्रकाशनानंतर या चित्रपटातील गाणी प्रेक्षकांच्या मनात रुंजी घालू लागली आहेत. प्रेक्षकांच्या वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी हा चित्रपट १४ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. सशक्त कथानक, कसदार अभिनय, नेत्रसुखद सादरीकरण, प्रयोगशील दिग्दर्शन, सुमधूर गीत-संगीत अशा बऱ्याच वैशिष्ट्यांनी नटलेला 'रील स्टार' प्रेक्षकांचे परिपूर्ण मनोरंजन करण्यासाठी सज्ज आहे.

या चित्रपटात रील स्टारची गोष्ट पाहायला मिळणार हे शीर्षकावरून सहज लक्षात येते. आजचा जमाना रील स्टारचा आहे. आज मनोरंजनासोबतच समाजात घडणाऱ्या घटना आणि जनमानसांत उमटणारे प्रतिबिंब टिपण्याचे काम रील स्टार करत आहेत. 'रील स्टार' चित्रपटामध्ये भानुदास नावाच्या रस्त्यावरील एका विक्रेत्याची आणि त्याच्या कुटुंबाची कथा आहे. हा चित्रपट म्हणजे भानुदासच्या स्वप्नपूर्तीचा अनोखा प्रवास आहे. स्वप्नांना गवसणी घालताना त्याने दिलेला लढा पाहण्याजोगा असून, अनेकांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे .

भारतातील काही सर्वोत्तम चित्रपटांची निर्मिती करणाऱ्या मल्याळम चित्रपट उद्योगातील तंत्रज्ञांची निर्मिती असलेला हा पहिला मराठी चित्रपट आहे. जोस अब्राहम, मोनिका आणि निशील कंबाती यांनी जे-फाइव्हज एंटरटेनमेंट्स, फिनिक्स ग्रुप आणि इनिशिएटिव्ह फिल्म्सच्या बॅनरखाली 'रीलस्टार' चित्रपटाची निर्मिती केली आहे.

मल्टीस्टारर हिंदी-मराठी 'अन्य' या चित्रपटाचे दिग्दर्शक सिम्मी आणि रॉबिन यांनी 'रील स्टार'चे दिग्दर्शन केले आहे. सिम्मी आणि कृष्णा एंटरप्रायझेस हे चित्रपटाचे सह-निर्माते आहेत. नागराज मंजुळे यांचे सहायक दिग्दर्शक सुधीर कुलकर्णी यांनी 'रीलस्टार'चे लेखन केले आहे. या चित्रपटात वेगवेगळ्या मुड्समधील आणि वेगवेगळ्या प्रसंगाना अनुसरून एकूण पाच गाणी आहेत.

'दृश्यम' फेम संगीतकार विनू थॉमस यांनी या चित्रपटातील चार गीतांना संगीतसाज चढवला असून, एक गाणे संगीतकार शुभम भट यांनी संगीतबद्ध केले असून शुभम भट यांनी सुप्रसिद्ध संगीतकार ए. आर. रेहमान यांचे सहायक म्हणून काम केले आहे.

# सुनील शेळके यांचे निधन

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील पानसरवाडी येथील सुनील बाळचंद शेळके वय वर्षे ५३ यांचे बुधवार दि. २२ ऑक्टोबर २०२५ रोजी वेदांत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अकोले येथे उपचारा दरम्यान निधन झाले. रिक्षातून उतरत असताना चक्कर येऊन पडल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने सुरुवातीला अकोलेतील डॉ. भांडकोळी हॉस्पिटल येथे प्राथमिक उपचार घेऊन त्यांना संगमनेरमध्ये आरोटे हॉस्पिटल येथे हलविण्यात आले. परंतु डोक्याला गंभीर मार असल्याने मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी त्यांना पुणे येथील के. ई. एम हॉस्पिटल येथे हलविण्यात आले. तेथे त्यांच्यावर मेंदूची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. व नंतर अकोलेतील वेदांत हॉस्पिटल येथे त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी, आई,वडील, दोन भाऊ, भावजय, पुतणे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर पानसरवाडी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मा. नगरसेवक परशुराम शेळके आणि सुरेशराव यांचे ते बंधू होते.

# जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींच्या पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन

**भक्ती, सेवा आणि सामाजिक कार्याचा संगम**

**हदगांव : (समर्थ गांवकरी)**



नांदेड जिल्ह्यातील हदगाव शहरात येत्या शुक्रवार, दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज (दक्षिणपीठ, नाणिजधाम) यांच्या पादुका दर्शन व प्रवचन दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा भव्य धार्मिक सोहळा हदगाव शहरातील नांदेड रोडवरील बीएसएनएल कार्यालयासमोर संपन्न होणार असून, यामध्ये भाविक भक्तांसाठी अध्यात्म, सेवा आणि संस्कारांचा मिलाफ अनुभवता येणार आहे. या संदर्भात माहिती देताना मराठवाडा उपपीठ प्रमुख जयप्रकाश लोणारी, पीठ व्यवस्थापक सुरेश मोरे, जिल्हा निरीक्षक बजरंग दायमा, जिल्हाध्यक्ष मुंडकर, आणि तालुका अध्यक्ष पांडुरंग नरवाडे यांनी सांगितले की, या कार्यक्रमात जगद्गुरुश्रींच्या पादुकांची भव्य शोभायात्रा हदगाव शहरातून काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत विविध धार्मिक देखावे, भजन-कीर्तन, ढोल-ताशे, दिंडी व भगव्या पताकांनी सजलेले वातावरण पाहायला मिळणार आहे.

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान हे केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचे केंद्र बनले आहे. संस्थानच्या माध्यमातून ग्रामस्वच्छता अभियान, मोफत इंग्रजी माध्यम शाळा, वेदपाठशाळा, मोफत दवाखाना, देहदान चळवळ, रुग्णवाहिका सेवा, आर्थिक दुर्बलांचे पुनर्वसन, महिला सक्षमीकरण, मोफत शिलाई मशीन व घरघंटी वाटप, कायदेविषयक साक्षरता शिबिरे, रक्तदान व वृक्षारोपण उपक्रम अशा शेकडो सेवाकार्यांचा व्यापक विस्तार महाराष्ट्रभर केला जात आहे.

फक्त यंदाच संस्थानने १५ दिवसांत १,३६,२७० रक्तकुपिकांचे संकलन करून शासकीय रक्तपेढ्यांना उपलब्ध करून दिले, तर 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत १,१०,६८७ वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनात मोलाचे योगदान दिले आहे.पादुका दर्शनानंतर संतपीठावर गुरुपूजन, उपासक दीक्षा, आरती सोहळा, प्रवचन, पुष्पवृष्टी व दर्शन कार्यक्रम संपन्न होणार आहेत. त्याचबरोबर समाजातील गरजूंना २९ मोफत शिलाई मशीनचे वाटप करण्यात येणार आहे. दिवसभर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन देखील करण्यात आले आहे.

# डिंगोरे उदापुर गटात व गणातून 'बॅनर वॉर'ला सुरुवात

## दोन पती देवांची प्रत्यक्ष गाठीभेटी सुरवात

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा परिषद व जुन्नर पंचायत समिती सदस्य पदाच्या निवडणुकीची रणधुमाळी घोषित होण्यास अजून आवधी असताना उदापुर,डिंगोरे पिंपळगाव जोगा गटात व गणात तापण्यास सुरुवात होऊ लागली आहे.निवडणुकीची अधिकृत घोषणा होण्या पूर्वीच, या गटात व गणातील अनेक इच्छुकांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा प्रभावीपणे वापर करत आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेचे दर्शन घडवले आहे. फेसबुक, व्हॉट्सअँप आणि इन्स्टाग्रामवर एकाचवेळी अनेक संभाव्य उमेदवारांचे आकर्षक डिजिटल बॅनर झळकू लागल्याने मतदारांमध्ये जोरदार चर्चा सुरू झाली आहे.मात्र याच गट व गणातील इच्छुक महिला उमेदवारांचे पतीदेव गावागावात व वाड्यावस्त्यांवर जाऊन मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेण्याचा सपाटा लावला आहे. उदापुर डिंगोरे पिंपळगाव जोगा गट आणि गणातून निवडणूक लढवण्यासाठी तयारी करणाऱ्या इच्छुकांनी आता पारंपारिक प्रचारासोबतच डिजिटल प्रचारा ला प्राधान्य दिले आहे.

## डिजिटलच्या माध्यमातून 'शक्ती प्रदर्शन'च

प्रत्येक इच्छुकाचा समर्थक वर्ग आपापल्या उमेदवाराचे बॅनर मोठ्या संख्येने शेअर करत असून, हे एक प्रकारचे 'डिजिटल शक्ती प्रदर्शन'च झाले आहे. मात्र काही इच्छुक उमेदवारांचे पती गटात आणि गणातील मतदार बंधू भगिनींच्या घरी जाऊन प्रत्यक्ष भेटीगाठी घेताना दिसतात आता निवडणूक प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वीच आम्हाला विविध उमेदवारांच्या तयारीची कल्पना येत आहे. सोशल मीडियामुळे निवडणुकीचा प्रचार लवकर सुरू झाला असून,आता प्रत्यक्ष निवड णुकीत काय होणार,याची उत्सुकता आहे.उदापुर, डिंगोरे पिंपळगाव जोगा गट व गणातून सध्या अनेक नवखे,हौशे नवशे तसेच अनुभवी चेहरे आतापासूनच गुडघ्याला बाशिंग बांधून निवडणुकीच्या मैदानात उतरण्याची तयारी करत आहेत.

# "मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतरही म्हाडाचा अहवाल नाही

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

लोकमान्यनगर परिसरातील सावली सहकारी गृहनिर्माण सोसायटी आणि स्थानिक रहिवाशी डॉ. मदन मोहन कोठुळे यांनी त्यांच्या जीर्ण इमारतींच्या पुर्नविकासावर लादण्यात आलेल्या स्थगितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ४० वर्षांहून अधिक जुनी आणि धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी शासन आणि म्हाडा प्रशासनावर निष्क्रियतेचे आरोप केले आहेत. या पार्श्वभूमीवर सावली सोसायटीने डॉ. कोठुळे यांच्या माध्यमातून वकिलांमार्फत (ॲड. रणजित गवारे आणि ॲड. भाग्यश्री बेलकर) मुख्यमंत्री, पुणे जिल्हाधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण महामंडळ आणि पुणे महानगरपालिका यांना कायदेशीर नोटीस दिली आहे. या नोटिसीत म्हटले आहे की, "इमारती अत्यंत जीर्णावस्थेत असून रहिवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरीदेखील लोकमान्यनगर परिसरात क्लस्टर डेव्हलपमेंटच्या नावाखाली सर्व पुर्नविकास प्रकल्पांवर ब्लँकेट स्थगिती लावणे अन्यायकारक आहे."

# कुंटूर जि. प. निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने चोंडे यांना उमेदवारी द्यावी

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

समस्या ग्रस्ताचे ओझे डोक्यावर घेऊन सक्रियपणे लोकात राहणारा धनगर समाजाचा नेता संजय चोंडे सद्यस्थितीत देशाचे आणि राज्याचे राजकारण जाती धर्मानीच चालले आहे विकास मात्र कुठेच दिसत नाही यावर काही जागरूक मतदार निश्चितपणे विचार करीत आहेत नायगाव तालुक्यातील कुंटूर जिल्हा परिषद सर्कल हे ओबीसी महिलेसाठी आरक्षित असल्याने ज्यांच्या हाती दायित्व पूर्वीपासूनच आहे गाव पातळीवर ग्रामपंचायतच्या माध्यमातून अनेक विकास कामे पारदर्शकपणे केलेली असल्याने कुंटूर सर्कल मधील मौजे शेळगाव छत्री येथील



श्रीमती अहिल्याबाई बालाजीराव पाटील चोंडे यांनाच कुंटूर जिल्हा परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने उमेदवारी द्यावी असे जागरूक नागरिकांचे ठाम मत आहे.

मौजे शेळगाव छत्री येथील स्वर्गीय बालाजीराव पाटील चोंडे यांचे कुटुंब गेल्या तीन पिढ्या पासून राष्ट्रीय काँग्रेस पक्षात काम करीत ते स्वर्गीय खासदार वसंतराव चव्हाण यांच्या घराण्याशी एकनिष्ठ पणे आहेत ते सर्वश्रुत आहे. लोकनेते कै. बळवंतराव चव्हाण यांच्या कार्यकाळात कै. गणपतराव पाटील चोंडे हे देखील एकनिष्ठपणे राहिले तर स्वर्गीय खासदार वसंतराव पाटील चव्हाण यांच्या कारकिर्दीत शेळगाव छत्रीचे माजी सरपंच बालाजीराव पाटील चोंडे हे एक जिवलग साथी खंदे समर्थक म्हणून होते आणि खासदार रवींद्र पाटील चव्हाण यांचा एक सच्चा कार्यकर्ता म्हणून संजय पाटील चोंडे यांची सर्वत्र ओळख आहे गेल्या तीन पिढ्यापासून एकनिष्ठ पणे राष्ट्रीय काँग्रेस पक्षामध्ये प्रेम करणारे आणि नायगावच्या चव्हाण घराण्याशी अतिशय जवळीकता असलेले शेळगाव छत्री येथील बालाजीराव चोंडे यांच्या पत्नी श्रीमती अहिल्याबाई चोंडे यांना काँग्रेस पक्षाने कुंटूर सर्कल मधून उमेदवारी देणे योग्य ठरेल, कारण चोंडेचे गावासह इतर गावात सामाजिक कामात भरीव योगदान आहे नायगाव तालुक्यात समाजासाठी एक सभागृह असावे असे अनेकांचे मत होते सामाजिक कामात अग्रेसर असलेले बालाजीराव चोंडे यांच्याकडे समाजाने ही मागणी घातली स्वर्गीय चोंडेनी आपल्या मनाचा मोठेपणा दाखवीत आपली स्वतःची रोड जवळची पाच गुंठे जमीन सभागृहासाठी दान म्हणून दिली तर तत्कालीन आमदार वसंतराव चव्हाण यांनी १५ लाख रुपये देऊन सभागृह बांधून दिले यावरही समाजाचे समाधान झालेले नव्हते तेव्हा दुसऱ्या जागी १५ गुंठे जमीन दान म्हणून चों डेनी दिली आणि माजी खासदार विकास महात्मे यांच्या निधीतून ६७ लाख रुपयाची मंजुरी मिळवून आणली काही बांधकाम देखील झाली आहे. वर्षभरात अनेक लहान मोठे सामाजिक धार्मिक कार्यक्रम राबवीत अन्नदान करणे यामध्ये रुची बालाजी पाटील चोंडे ना होती एवढेच नव्हे तर त्यांनी गोरगरीब लोकांना देवदर्शन घडविले ज्या गरीब लोकांना मनात इच्छा असूनही तिरुपती सारख्या दूरच्या देवदर्शनाला जाता येत नसल्याने त्यांची इच्छा देखील चोंडेनी पूर्ण केली दरवर्षीच टप्प्याटप्प्याने कितीतरी लोकांना विनामूल्य तिरुपती दर्शन घडविले, एक विशेष बाब म्हणजे सोबत असलेल्या यात्रेकरूंना स्वतःच्या हाताने स्वयंपाक बनवून खाऊ घालणे यामध्ये एक वेगळाच आनंद चोंडे कुटुंबांना वाटायचा ही पवित्र सेवा हे न विसरणारे क्षण आजही लोकांच्या मनात आहे.

म्हणून श्रीमती अहिल्याबाई यांना मतदान रूपी आशीर्वाद आपण द्यावेत असे कुंटूर सर्कल मधील नागरिकांना वाटते,स्व. बालाजी पाटील चोंडे यांची पत्नी आणि संजय पाटील चोंडे यांची आई श्रीमती अहिल्याबाई बालाजीराव चोंडे यांच्या हाती पूर्वीपासूनच दानत्व आहे.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# संधी मिळाल्यास गावाप्रमाणे विकास करणार - मा सरपंच शेंडे

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



जनसेवेचा ठसा उमटविणाऱ्या शेडगावच्या माजी सरपंच संध्या विजय शेंडे या सध्या आढळगाव गटातील जिल्हा परिषद निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत असलेल्या उमेदवारांपैकी एक आहेत. त्या मा. सरपंच विजय शंकर शेंडे यांच्या पत्नी असून, या दांपत्याने गेल्या दशकभरात शेडगाव ग्रामपंचायतीचा सर्वांगीण विकास साधला आहे. घरातूनच राजकारण आणि समाजकारणाचे बाळकडू मिळाल्याने विजय व संध्या शेंडे यांनी दोन पंचवार्षिक कार्यकाळात सरपंच म्हणून काम करत ग्रामविकासाचे नवे पर्व सुरू केले. २०१५ ते २०२० या काळात विजय शेंडे यांनी सरपंच म्हणून गावाचा चेहरामोहरा बदलला, तर २०२१ ते १८ ऑगस्ट २०२५ या काळात संध्या शेंडे यांनी ग्रामपंचायतीचा कारभार हाती घेत शेडगावला विकासाच्या नव्या उंचीवर नेले. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार प्राप्त झाला. सर्वांना संधी मिळावी या हेतूने त्यांनी स्वेच्छेने राजीनामा दिला आणि १० ऑक्टोबर २०२५ रोजी मंगला बाळासाहेब शेंडे यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाली.

शेंडे दांपत्याच्या नेतृत्वाखाली शेडगावमध्येए अनेक नवे उपक्रम राबविण्यात आले वृक्षलागवड मोहिमांमुळे गावाचे पर्यावरणीय सौंदर्य वाढले, वाड्या-वस्त्यांना जोडणारे पक्के रस्ते बांधून ग्रामविकासाला गती मिळाली, तंटामुक्त शेडगाव घडविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे योगदान विशेष राहिले. विद्यार्थ्यांसाठी व स्पर्धा परीक्षार्थ्यांसाठी अधिकारी व यशस्वी व्यक्तींच्या मार्गदर्शनपर व्याख्यानमाला त्यांनी आयोजित केल्या तसेच लोकसहभागातून जिल्हा परिषद शाळेसाठी वर्गखोली बांधण्यास मदत केली. सांस्कृतिक व सामाजिक सलोखा वाढवणारे विविध कार्यक्रम राबवून त्यांनी जनसामान्याचे मन जिंकले. विजय शेंडे यांनी सरपंच परिषद अध्यक्ष म्हणून काम करत शेडगाव ग्रामविकासात मोठा वाटा उचलला. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना इंडियन पिनॅकल नॅशनल अवॉर्ड २०२४ तसेच राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शेडगावचा सर्वांगीण विकास पाहून परिसरातील ग्रामस्थ 'शेंडे दांपत्याचे' कौतुक करीत आहेत. या सर्व कार्यामुळे संध्या शेंडे या आढळगाव गटातील जिल्हा परिषद पदासाठी जनतेच्या मनातील उमेदवार ठरत आहेत. जनतेशी नाळ जोडणारे, विकासाचे प्रत्यक्ष ध्येय साधणारे नेतृत्व म्हणजेच संध्या शेंडे असा विश्वास आढळगाव मतदारात दिसून येतो.




ठाणे : दिवा शहर परिसरातील अनेक आगरी महिलांनी दिवा पोलीस चौकी येथे मोर्चा काढून धडकल्या. वाढत्या लोकसंख्येच्या दिव्यात विविध जाती धर्माचे लोक रहायला आले आहेत. ऐका महिलेने सोशल मिडियावर आगरी लोक तुमच्यामुळे श्रीमंत झालेत ते वाईट आहेत त्यांच्या मुलींविषयी अपशब्द वापरल्याने महिला संतप्त झाल्यामुळे आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान दिवा तसेच भाजपच्या रेशमा नरेश पवार तसेच बजरंग दलाचे दिवा शहर अध्यक्ष विनोद भगत यांनी सदर महिलेवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली.

**(फोटो - संतोष पडवळ)**

## थोडक्यात बातम्या...

### तरुणांना जमीन मिळवून दिल्याबद्दल ॲड फैसल आलम यांचे कौतुक



वसमत **(स. गांवकरी)** : कायद्याचा आधार देत अनेकांना दिला न्यायाचा दिलासा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNS) अंतर्गत व ॲट्रॉसिटी यासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये अडकलेल्या पक्षकारांना न्याय मिळवून देण्यात ॲड. फैसल आलम यांचे कार्य प्रशंसनीय ठरले आहे. न्यायालयात सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे त्यांनी अनेक आरोपींना जामीन मिळवून दिला असून, त्यांच्या तर्कशुद्ध मार्गदर्शनामुळे जनतेत विश्वास वाढला आहे. नुकत्याच ॲड. फैसल आलम यांनी गरीब कुटुंबातील तरुणांना जमीन मिळवून देऊन त्यांना नवा आयुष्याचा मार्ग दाखवला. स्थानिक नागरिक आणि सामाजिक मंडळी यांनी त्यांच्या या योगदानाचे कौतुक करताना सांगितले की, "कायद्याचा योग्य वापर करून गरजू लोकांना मदत करणे हेच खरी सेवा आहे. फैसल आलम यांनी हे दाखवून दिले." त्यांच्या या प्रयत्नांमुळे स्थानिक समाजात न्यायप्रक्रियेवर विश्वास वाढला असून, अनेक नागरिकांमध्ये कायद्याची गरज आणि महत्त्व अधोरेखित झाले आहे. न्यायालयीन प्रक्रियेत पारदर्शकता राखून दिलासा मिळवून देण्याच्या त्यांच्या कामामुळे समाजात प्रेरणा निर्माण झाली आहे.

### पिझ्झा नाईट्स, चहा ब्रेक्स आणि हसणे-खिदळणे



पुणे **(स. गांवकरी)** : झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'जाने अनजाने हम मिले' प्रेक्षकांच्या मनात वेगळं स्थान निर्माण करत आहे. या मालिकेची हृदयस्पर्शी कथा आणि रीत (आयुषी खुराणा) व राघव (भरत अहलावत) यांच्यातील सुंदर केमिस्ट्रीमुळे प्रेक्षकांचा प्रतिसाद दिवसेंदिवस वाढतो आहे. सध्या मालिकेत भावनिक वळण दिसत असलं, तरी पडद्यामागचं चित्र मात्र अगदी उलट आहे – आनंद, हास्य आणि आपुलकीनं भरलेलं! शूटिंगच्या गडबडीतही हे कलाकार एकमेकांशी वेळ घालवायला विसरत नाहीत. दिवसभराचं काम संपलं की घरी धाव घेण्याऐवजी हे सगळे मिळून गप्पा, खाणं-पिणं आणि मजा करत छान क्षण तयार करतात. भरत अहलावत म्हणाला, "आमचा सेट घरासारखा वाटतो. कामानंतर आम्ही एकत्र बसतो, काहीतरी खायला मागवतो आणि गप्पा मारतो. कधी माझ्या आईचं घरचं जेवण सगळ्यांसाठी येतं, आणि आता ती एक गोड परंपरा झाली आहे. या सगळ्या क्षणांमुळे आमचं एकत्र काम करणं आणखी खास होतं." आयुषी खुराणा हसत म्हणाली, "शूटिंगदरम्यान आम्ही पात्रांच्या भावना जगत असतो. त्यामुळे कॅमेरा बंद झाला की थोडं स्वतःसारखं जगणं महत्त्वाचं वाटतं. आम्ही दोघे पिझ्झा खायला बाहेर जातो, दिवसभरातील गंमतीदार गोष्टी शेअर करतो, आणि दुसऱ्या दिवशी नव्या ऊर्जेनं परत सेटवर जातो." कीर्तीच्या भूमिकेत दिसणारी गौरी अग्रवाल सांगते, "आमचा आवडता चहाचा कट्टा सेटजवळच आहे. तिथला कडक चहा आणि बन मस्का आमच्या दिवसभराचा थकवा घालवतो. त्या गप्पांतूनच आमच्या सर्वात मजेशीर आठवणी तयार होतात." या छोट्या पण मनाला भिडणाऱ्या क्षणांमुळे 'जाने अनजाने हम मिले'च्या सेटवरचं वातावरण घरासारखं वाटतं. पडद्यामागची ही खरी मैत्रीच त्यांच्या ऑन-स्क्रीन केमिस्ट्रीतून झळकते, जी मालिकेला अजून खास बनवते.

### ऑफिसरची भूमिका साकारताना रचनाने उलगडला संयमाचा प्रवास



पुणे **(स. गांवकरी)** : झीटीव्हीवरील'जागृति – एक नयी सुबह'ही मालिका आपल्या प्रेरणादायी आणि भावनिक कथानकामुळे प्रेक्षकांना सतत खिळवून ठेवत आहे. या मालिकेत एक धक्कादायक वळण येते, जेव्हा जागृति (रचना मिस्त्री) चित्ताया वंचित समाजातून आलेली एक निडर आयपीएस अधिकारी आपल्या देशाला वाचवण्यासाठी स्वतःच्या आईवर गोळी झाडते. हा क्षण तिच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख ठरतो, जिथे ती आपल्या सगळ्यात जवळच्या नात्यापेक्षा कर्तव्याला प्राधान्य देते आणि न्यायासाठी ठामपणे उभी राहते.त्यासाठी तिला असंभव निर्णय घ्यावा लागला तरी ती मागे हटत नाही. जागृतीची भूमिका साकारताना रचनासाठी हा एक अतिशय समृद्ध करणारा अनुभव ठरला कारण या प्रवासाने तिला दाखवून दिले की खरी ताकद म्हणजे आक्रमकता नव्हे, तर शांत पण ठाम निर्धार हे आहे . या भूमिकेमुळे तिला एका अधिकाऱ्याच्या जीवनासोबतजवळून परिचय झाला.त्यातील शिस्त, नेमकेपणा आणि संयम यांचा अभ्यास करता आला, आणित्यामुळे ती ही व्यक्तिरेखा अधिक वास्तविकता आणि सखोलपणे साकारू शकली. रचना मिस्त्री म्हणाली, "हे आत्तापर्यंत मी साकारलेल्या भावनिकदृष्ट्या सर्वात जास्तथकवणाऱ्या पण तितकेच सबळ बनवणारेदृश्य होते.जागृतिची वेदना आणि तिची कर्तव्यभावना प्रामाणिकपणे दाखवण्यासाठी मी तिच्या लहानपणापासून ते आयपीएस अधिकारी बनण्याच्या स्वप्नापर्यंततिच्या प्रवासात पूर्णपणे समरस झाले. शूटच्या आधी मीजागृतिम्हणून जर्नलिंगही केले आणिस्वतःला आठवण करून दिली की 'आता हेच तिचे सत्य आहे.'

# किनवटमध्ये भाजपाची जनसंवाद सभा उत्साहात संपन्न

## *माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण व आमदार भीमराव केराम यांची प्रमुख उपस्थिती*

**किनवट : (समर्थ गांवकरी)**




नगर परिषद निवडणूक जाहीर झाल्यानंतर किनवट येथे भारतीय जनता पक्षातर्फे जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात आले. ही सभा दि. 5 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 6 वाजता भव्य उत्साहात पार पडली. या सभेला राज्याचे माजी मुख्यमंत्री व खासदार खा. अशोकराव चव्हाण तसेच आमदार भीमराव केराम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी जिल्हाध्यक्ष सुधाकर भोयर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. किशन मिरासे, बाळकृष्ण कदम व माजी उपनगराध्यक्ष अनिल तिरमनवार, अशोक नेम्मानिवार यांनी संयुक्तपणे केले, तर आभार प्रदर्शन भाजप किनवट मंडळाध्यक्ष स्वागत आयनेनिवार यांनी केले.

सभेच्या सुरवातीस माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानिवार, वेंकट नेम्मानिवार, अजय चाडावार, बालाजी धोत्रे, मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनिवार, उमाकांत कऱ्हाळे पाटील, सूर्यकांत अरण्डकर, नरेश श्रीमानवार, शिवा क्यातंवार व शिवाजी आंधळे यांनी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण व आमदार भीमराव केराम यांचा भव्य पुष्पहार घालून सत्कार केला.

सभेत मार्गदर्शन करताना आ. भीमराव केराम यांनी आपल्या भाषणातून किनवटकर जनतेस आवाहन केले की, "आगामी नगर परिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना आपला आशीर्वाद द्या."

तर खा. अशोकराव चव्हाण यांनी केंद्र व राज्यातील "डबल इंजिन सरकार" च्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजना, "विकसित भारत – विकसित महाराष्ट्र – विकसित किनवट" या संकल्पनेवर सविस्तर भाष्य केले. त्यांनी 'व्हिजन 2047' अंतर्गत पक्ष कार्य व भविष्यातील योजना याबाबत माहिती देत कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह निर्माण केला.

सभा परिसरात मोठ्या संख्येने नागरिक, कार्यकर्ते व पत्रकार उपस्थित होते. इच्छुक उमेदवारांनी आपल्या समर्थकांसह जोरदार शक्तीप्रदर्शन केले. यामध्ये मारोती मुनेश्वर, गंगुबाई परेकर, मधुकर अन्नेलवार, धीरज नेम्मानिवार, वेंकट नेम्मानिवार, नैतिक नाईक, सौ. नगराळे आदींनी जोरदार शक्ती प्रदर्शन केले.

सभास्थळ नागरिकांनी गच्च भरले होते. अनेकांनी बाहेरूनही सभा ऐकली. किनवटसह परिसरातील नागरिक, कार्यकर्ते व पत्रकार यांची उपस्थिती लक्षवेधी ठरली. नगराध्यक्ष तसेच नगरसेवक पदाचे अनेक इच्छुक उमेदवार या जनसंवाद सभेत उपस्थित राहून पक्षाच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

# १७,०३३ उमेदवार देणार परीक्षा

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ (Teacher Eligibility Test – TET) रविवार, दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यभर आयोजित करण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यातील एकूण ३२ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा दोन सत्रांमध्ये होणार असून १७,०३३ उमेदवार परीक्षेला बसणार आहेत. टीईटी म्हणजे Teacher Eligibility Test ही शिक्षक म्हणून नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता परीक्षा आहे. उमेदवारांच्या अध्यापन क्षमतेचे, शैक्षणिक ज्ञानाचे तसेच बालविकास व शैक्षणिक मानसशास्त्राचे मूल्यांकन करण्यासाठी ही परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा राष्ट्रीय शिक्षण हक्क कायदा, २००९ (RTE Act) अंतर्गत बंधनकारक असून, गुणवत्तापूर्ण शिक्षक उपलब्ध करून देणे हा तिचा प्रमुख हेतू आहे. ठाणे जिल्ह्यातील परीक्षेसाठी पेपर-I साठी ७,८०३ आणि पेपर-II साठी ९,२३० उमेदवारांनी अर्ज केला आहे. पेपर-I सकाळी १०.३० ते दुपारी १.०० व पेपर-II दुपारी २.०० ते ४.३० या वेळेत होईल. शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद ठाणे यांच्यामार्फत उपशिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी यांनी प्रत्यक्ष शाळांना भेट देऊन सर्व परीक्षा केंद्रांवरील आवश्यक भौतिक सुविधा व बैठक व्यवस्थेची तपासणी केली आहे.

# ठाण्यात ९ नोव्हेंबरला भारत मुक्ती मोर्चा आयोजित विशाल जन आक्रोश रॅली

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**




ठाण्यात ९ नोव्हेंबरला विशाल जन आक्रोश रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. भारत मुक्ति मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग (OBC) मोर्चा, राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा आणि बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क यांच्या संयुक्त विद्यमाने आज ठाणे शहरातील वर्तक नगर येथे पत्रकार परिषद पार पडली. सदर पत्रकार परिषदेत "विशाल जन आक्रोश रॅली" संदर्भात घोषणा करण्यात आली. सदर रॅली ९ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता वर्तक नगर, ठाणे येथून सुरु होऊन खारटन मार्गे कोर्ट नाका येथे समारोप होणार आहे. भारतातील सर्व निवडणुका या EVM मशीनऐवजी बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, इतर मागास प्रवर्ग (OBC) व इतर सर्व जातींची जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, बोधगया येथील महाविहार हे बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्यात यावे, आदिवासी समाजावर होणाऱ्या अन्यायाला पायबंद घालण्यात यावा, महिलांच्या सुरक्षेसाठी व सन्मानासाठी विशेष कायदे कठोरपणे लागू करण्यात यावेत, खाजगीकरण व शिक्षणातील व्यावसायिक लुटीविरोधात कायदेशीर उपाययोजना करण्यात याव्यात, शेतकऱ्यांना MSP (किमान आधारभूत किंमत) कायद्याने हमीभाव देण्यात यावा, पेन्शन योजना व जुन्या पेन्शनचे पुनर्संचयन करण्यात यावे, मुस्लिम समाजाच्या संवैधानिक अधिकारांचे संरक्षण व मॉब लिंचिंगविरोधी कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी तसेच SC, ST, OBC कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत आरक्षण तात्काळ लागू करण्यात यावे या मागण्या असून सर्व वंचित, बहुजन, ओबीसी, अनुसूचित जाती-जमाती, आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजाचे संविधानिक, सामाजिक व राजकीय हक्क अबाधित ठेवण्यासाठी लढणाऱ्या सर्व संघटनांचा संयुक्त आवाज असणार आहे.

सदर रॅलीतून बहुजन समाजाने एकत्र येऊन संविधान, सामाजिक न्याय आणि हक्कांसाठी लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला जाणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले असून अधिक माहितीसाठी 83696 16049 या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मच्छिंद्र चाकणे सरांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



"शिक्षक हे समाजाचे दिशादर्शक, आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यातील वाटचालीचे खरे शिल्पकार असतात." या विचाराला मूर्त रूप देत, साईनगरी शिर्डी येथे 'बी द चेंज फाउंडेशन' तर्फे रविवार, दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा २०२५ मोठ्या उत्साहात पार पडला. शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अनेक शिक्षकांचा या मंचावर सन्मान करण्यात आला. ग्रामीण शिक्षकाची नवकल्पना ठरली राज्यस्तरीय प्रेरणा या सोहळ्यात कोकणगाव शाळेतील शिक्षक मच्छिंद्र भानुदास चाकणे सर यांना शिक्षण क्षेत्रातील योगदान, शैक्षणिक व्हिडिओ निर्मितीतील अभिनव कल्पना आणि विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उत्सुकता निर्माण करण्याच्या प्रयत्नांसाठी 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५'ने सन्मानित करण्यात आले.

चाकणे सरांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञान अधिक सुलभ आणि रोचक पद्धतीने पोहोचवण्यासाठी तयार केलेले शैक्षणिक व्हिडिओ राज्यभर चर्चेत आले. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शिक्षण अधिक जिवंत बनवणारे शिक्षक म्हणजे चाकणे सर — हे या पुरस्कारातून अधोरेखित झाले.

त्यांना माणिक आढाव केंद्रप्रुख, वाजे मॅडम विस्तार अधिकारी, नीलकंठ बोरुडे विस्तार अधिकारी ,कुसुमकुमारी कानडी मॅडम गटशिक्षणाधिकारी यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले शाळेतच झाला सन्मानाचा क्षण वैयक्तिक कारणांमुळे शिर्डी येथील कार्यक्रमास हजर राहता न आल्याने, फाउंडेशनतर्फे पुरस्कार कुरिअरद्वारे कोकणगाव शाळेत पाठविण्यात आला.

# एण्ड टीव्ही कलाकारांनी आठवणी व परंपरांबाबत सांगितले!

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

देवांचा दिव्यांचा सण म्हणून ओळखला जाणारा देव दीपावली भारतातील सर्वात दिव्य आणि मनमोहक सण आहे. दिवाळीनंतर पंधरा दिवसांनी साजरा केला जाणाऱ्या या पवित्र सणानिमित्त वाराणसीच्या घाटावर अनेक दिवे, उत्साही प्रथा आणि हृदयस्पर्शी भक्ती पाहायला मिळते. लाखो व्यक्ती गंगा नदीकाठी हे दिव्य दृश्य पाहण्यासाठी येणार असताना एण्ड टीव्हीवरील कलाकार पारस अरोरा (जीतू, घरवाली पेडवाली), गीतांजली मिश्रा (राजेश, हप्पू की उलटन पलटन) आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, भाबीजी घर पर है) यांनी या तेजस्वी सणाबाबत त्यांच्या गोड आठवणी, कौटुंबिक प्रथा आणि आध्यात्मिक संबंधांबाबत सांगितले. एण्ड टीव्हीवरील आगामी मालिका घरवाली पेडवालीमध्ये जीतूची भूमिका साकारताना पाहायला मिळणारे पारस अरोरा म्हणाले, देव दीपावली सण माझ्यासाठी नेहमी जादुई अनुभव राहिला आहे.

# किनवट तालुक्याची सुधारीत पैसेवारी ३७ टक्के; शेतकऱ्यांना दिलासा

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



यंदाच्या खरीप हंगामात सततचा पाऊस, अतिवृष्टी आणि रोगराईमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सोयाबीनचे पीक हातचे गेले असून कपाशीची स्थितीही अत्यंत गंभीर आहे. या पार्श्वभूमीवर महसूल प्रशासनाने नुकसानीचा आढावा घेण्यासाठी प्रारंभी काढलेली नजरअंदाज पैसेवारी ३७ पैसे इतकी होती. पुढे खरीप पिकांची स्थिती आणखीनच बिकट झाल्याने तहसील प्रशासनाने ३१ ऑक्टोबर रोजी सुधारीत पैसेवारी जाहीर केली, तीही पूर्वीइतकीच ३७ पैसे निघाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. तालुक्यातील एकूण १९१ गावांमध्ये पैसेवारी लागू असून लागवडीयोग्य क्षेत्र ८१ हजार ७४. ७८ हेक्टर आहे. त्यापैकी खरीप हंगामात ७९ हजार १४१ हेक्टरवर पेरणी झाली, तर २ .हजार २२८. ७८ हेक्टर क्षेत्र पडीक राहिले. यंदाच्या पावसाळ्यात तालुक्यात एकूण १२ अतिवृष्टीच्या घटना नोंदल्या गेल्या आहेत. महसूल मंडळनिहाय पाहता जलधारा मंडळात ९ शिवणीमध्ये ७, सिंदगी मोहपूरमध्ये ५, इस्लापूर, मांडवी, दहेली आणि उमरीबाजार मंडळात प्रत्येकी ४ तर किनवट व बोधडी मंडळात प्रत्येकी ३ अतिवृष्टी झाल्याची नोंद आहे. अशा प्रकारे एकूण ४३ वेळा झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

पूरस्थितीमुळे एकूण पेरणी क्षेत्रापैकी सुमारे ५६ हजार ६३४ हेक्टरवरील जिरायती पिकांचे तब्बल ३३ टक्क्यांहून अधिक नुकसान झाले. या नैसर्गिक आपत्तीचा फटका १७६ गावांतील ५१ हजार ४८८ शेतकऱ्यांना बसल्याचा अहवाल तहसील प्रशासनाने यापूर्वीच जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला होता. साधारणपणे पैसेवारी ५० टक्क्यांच्या आत असेल तर पीकस्थिती गंभीर मानली जाते, तर ५० टक्क्यांपेक्षा जास्त पैसेवारी उत्तम स्थिती दर्शवते. त्यानुसार शासन ओला किंवा कोरडा दुष्काळ जाहीर करून मदत देते.

या पार्श्वभूमीवर तहसीलदार डॉ. शारदा चोंडेकर यांनी ३० सप्टेंबर रोजी खरीप हंगाम २० २५ ची हंगामी पैसेवारी जाहीर केली होती. त्यानंतर उपजिल्हाधिकारी, तहसीलदार आणि नायब तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली नऊ महसूल मंडळांतील निवडक सज्जांमध्ये हलक्या, मध्यम आणि भारी जमिनीत प्रत्येकी तीन पीक कापणी प्रयोग घेऊन गाव पैसेवारी समितीच्या सहकार्याने सुधारीत पैसेवारी निश्चित करण्यात आली.

ओल्या दुष्काळाच्या सावटाखाली असलेल्या किनवट तालुक्यातील नऊही महसूल मंडळांतील ३१ ऑक्टोबर रोजी जाहीर झालेली सुधारीत पैसेवारी अपेक्षेप्रमाणे नजरअंदाज इतकीच — म्हणजेच ३७ पैसे (५० पैशांपेक्षा कमी) — निघाल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### सवलती लागू

शासनाने जिल्ह्यातील सर्व १६ तालुके आपत्तीग्रस्त घोषित केले असून, बाधितांना दुष्काळसदृश परिस्थितीत लागू असणाऱ्या सर्व सवलती देण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार जमीन महसुलात सूट, सहकारी कर्जांचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जवसुलीला एका वर्षाची स्थगिती, तिमाही वीज देयकात माफी, परीक्षा शुल्कात माफी आणि दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांच्या फी माफीची तरतूद करण्यात आली आहे.

# अक्षय कर्डीले यांच्याबाबत पालकमंत्री विखेंचे मोठे वक्तव्य

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील राहुरी येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यास उपस्थित राहून पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला. स्व. आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्या निधनानंतर प्रथमच हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. शोकाकुल वातावरण असूनही कार्यकर्त्यांमध्ये नव्या जोमाने कार्य सुरू करण्याचा दृढ निर्धार दिसून आला. याप्रसंगी सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना आवाहन करताना, स्व. शिवाजीराव कर्डीले यांनी राहुरी तालुक्याच्या




विकासासाठी पाहिलेली स्वप्ने पूर्णत्वास नेण्यासाठी आणि त्यांचा अपूर्ण राहिलेला विकास साकार करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

तसेच, येणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये महायुतीचा शतप्रतिशत विजय सुनिश्चित करण्यासाठी एकजुटीने, संघटितपणे आणि जनतेच्या विश्वासावर काम करण्याचे आवाहन केले. यावेळी कर्डिले साहेबांवर प्रेम करणारा प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. राजकारणात धोबीपछाड कसे करायचे हे स्व. शिवाजीराव कर्डीले यांना चांगले ठाऊक होते, आणि ते गुण त्यांनी निश्चित अक्षयलाही दिले असतील, आता सर्व कार्यकर्त्यांनी झोकून देऊन काम करत सत्ता मिळवावी, हीच खरी श्रद्धांजली स्व. शिवाजीराव कर्डीले यांना ठरेल, असे प्रतिपादन ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केले.

डॉ .सुजय विखे पाटील म्हणाले, "स्व. कर्डीले हे माझे मार्गदर्शक मित्र व जिल्ह्यातील राजकारणातील वस्ताद होते. त्यांच्या जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अक्षय कर्डीले ही जबाबदारी समर्थपणे पेलतील, आणि राहुरी नगरपरिषदेत महायुतीचा झेंडा फडकवणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल."

आ. संग्राम जगताप यांनी सांगितले की, "स्व. कर्डीले हे कामाचा झपाटा लावणारे, प्रामाणिक आणि जनतेशी घट्ट नाते राखणारे नेते होते. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था व पोटनिवडणुकीत सर्वांनी अक्षय कर्डीले यांच्या पाठीशी उभे राहावे."



नारायणगाव : त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त ग्रामपंचायत नारायणगाव व लायन्स क्लब ऑफ शिवनेरी यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. 5 नोव्हेंबर 2025 रोजी गंगा आरती व तुळशी विवाह सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमासाठी नारायणगाव परिसरातील असंख्य महिला उपस्थित होत्या. सहभागी महिलांना भेटवस्तू देण्यात आली.

## थोडक्यात बातम्या...



### जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल दादाभाऊ कळमकर यांचा सत्कार


■ कळमकर यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा नव्या उमेदीने पक्ष बांधणीची सुरूवात - संजय झिंजे

अहिल्यानगर (स. गांवकरी) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार गट) अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर यांची नुकतीच निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक संजय झिंजे, उद्योजक शरद मडूर, प्रा. एल. बी. म्हस्के, धनंजय देशमुख, सुभाषराव बर्वे, बाबासाहेब जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. माजी नगरसेवक संजय झिंजे म्हणाले की, दादाभाऊ कळमकर हे पक्षाचे अनुभवी, संयमी आणि जनतेशी जोडलेले नेते आहेत. त्यांनी १९९७ ते २००९ या कालावधीत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष म्हणून प्रभावी नेतृत्व केले. त्यांच्या जनसंपर्कामुळे आणि कार्यक्षमतेमुळे पक्षाने जिल्ह्यात मजबूत पाय रोवले. आता पुन्हा त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षात नवचैतन्य निर्माण होईल. कळमकर हे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे विश्वासू सहकारी मानले जातात. त्यांच्या एकनिष्ठ कार्यशैलीमुळे आणि सर्वत्र असलेला जनसंपर्कने पक्षाला बळ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. उपस्थितांनी पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांपैकी एक म्हणून कळमकर यांची ओळख असून, जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसची घडी बसविण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहणार असल्याची भावना व्यक्त केली. त्यांच्या नेतृत्वामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला येत्या काळात नवी दिशा आणि बळ मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### जिल्हाधिकारी यांना सिंधी समाजाच्या वतीने बघेल वर कारवाईसाठी निवेदन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : सिंधी समाज व सिंधी समाजाचे इष्टदेवता झुलेलाल यांच्या संबंधी अनुद्गार काढून समाजाच्या धार्मिक भावना दुखवणाऱ्या अमित बघेल याच्यावर कारवाई करण्याबाबत आज सकल सिंधी समाजातर्फे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले हे निवेदन पुढे केंद्र व राज्य सरकारला पाठवावे अशी विनंती यावेळी करण्यात आली. निवेदनातं म्हटले आहे कि नुकतेच आमच्या पाहण्यात छत्तीसगड येथील एका तथाकथीत पक्षाचे प्रमुख नामे अमित बघेल यांचे सिंधी समाजासंबंधी अनुदगार सोशल मिडीयावर पाहण्यात आले. त्यामध्ये सदर बघेल याने सिंधी समाजासंबंधी पाकिस्तानी संबोधून समाजाच्या इष्टदेवता झूलेलाल यांच्यासंबंधी अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन अनुद्गार काढलेले आहेत. त्यांनी सिंधी समाजावर कोणतेही कारण नसताना टिका करताना सिंधी समाजाच्या 'देवतेसंबंधी देखील घणास्पद वक्तव्य केलेले आहे. त्यामुळे आमच्या सिंधी बाधवाच्या धार्मिक भावना मोठ्या प्रमाणावर द्खावल्या आहेत. तसेच त्यामध्ये आम्हा सिंधी समाजाच्या भावनांचा खूप अनादर झालेला असून त्यांचे वक्तव्य हे अत्यंत निंदनीय असे आहे. त्याबाबतची क्लीप आम्ही आपल्याकडे या निवेदनासोबत सादर करीत आहोत. तरी आपणास या निवेदनाद्वारे विनंती ही सदर प्रकरणी सिंधी जनरल पंचायत अहिल्यातयार व समस्त सिंधी समाज बांधवांची संबंधित अमित बघेल या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर तक्रार असून त्याची नोंद घेऊन कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी. यावेळी सिंधी जनरल पंचायतीचे अध्यक्ष महेश मध्यान,उपाध्यक्ष सुरेश हिरानंदानी,सेक्रेटरी प्रदीप अहुजा,रमेश तनवाणी,रमेश कुकरेजा ,सुनील बजाज, जयकुमार खूबचंदानी, विनोद कुकरेजा, जयकुमार रंगलानी , भरत नवलानी, राजकुमार बजाज, आदिसह सिंधी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### गुलमोहर रोडला ९ नोव्हेंबरला विनामूल्य महा आरोग्य शिबीर




अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर येथील गुलमोहर रोडला विनामूल्य महा आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले असून त्यामध्ये नामांकित अस्थिरोग तज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ,पोटासंबंधी समस्या,बालरोगतज्ज्ञ,मोफत चष्म्यांसह,नेत्रतज्ज्ञ,रक्त तपासणी करणार आहेत या शिबिरासाठी आ. संग्राम भैय्या जगताप यांचे मार्गदर्शन लाभले असून वाबळे मित्रमंडळ,भारतीय माजी सैनिक संघटना,नगर जिल्हा माजी सैनिक संघटना यांचे सहकार्य लाभले आहे अशी माहिती मनसुख वाबळे व सौ.शालिनी वाबळे यांनी दिली आहे. रविवार दिनांक ९ नोव्हेंबर रोजी सकाळी 9 ते दुपारी 2 यावेळेत हे शिबीर आम्रपाली मंगल कार्यालयाजवळ, गुलमोहररोड,पारिजात चौक, सावेडी नगर येथे होणार आहे.यामध्ये डॉ.राहुल पंडित(एमएस ऑर्थो., एमसीएचऑर्थो)पंडित अपघात रुग्णालय आणि युनिक आयसीयू,डॉ. अतुल खालकर, डॉ.अरविंद अनचवले एम.एस. (जनरल सर्जन) एफ्फ. आय. जी.ई.एस.खालकर हॉस्पिटल, डॉ.अमित करडे स्त्रीरोगतज्ज्ञ आणि लॅपरोस्कोपिक सर्जन, प्रजनन तज्ज्ञ,सुखदारुग्णालय, डॉ.रामदस बांगर,बालरोगतज्ञ, सिद्धिविनायक रुग्णालय, डॉ.प्रफुल चौधरी स्वस्तिक नेत्रालय आणि मॅटर्निटी हॉस्पिटल हे नामांकित डॉक्टर उपस्थित राहून तपासणी करणार आहे. तरी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले असून अधिक माहितीसाठी संपर्क सागर वाबळे-99224 27671,मनसुख वाबळे, माजी सैनिक मो.९८२२४२७६७१, शालिनी वाबळे,समाजसेविका मो.९९२२४२७६७१ वर संपर्क साधावा.

# पक्षाकडे उमेदवारी मागणार आहे, परंतु न मिळाल्यास पक्ष देईल त्याचे काम करणार

## भाजपचे जेष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात

**जामखेड तालुका (समर्थ गांवकरी)**

जामखेड सध्या सुधारीत शहर नाही तर गुंडाचे शहर बनत चालले आहे. जामखेड शहर भकासाकडे घेऊन जाणारे नाही तर विकासाकडे घेऊन जायचे शहर बनवायचे आहे. जामखेडला संदर जामखेड सोबत हाताला रोजगार देणारं जामखेड बनवायचे यासाठी मी जामखेड नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी भाजपाकडून नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक आसुन पक्षाने संधी दिल्यास जामखेड नगरपरिषदेची निवडणूक लढविणार आहे आशी माहिती भाजपचे जेष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात यांनी व्यक्त केले आहे. गुरवार दि 6 नोव्हेंबर रोजी सकाळी जेष्ठ नेते मधुकर आबा राळेभात यांची पत्रकार परिषद निवडणुकीच्या पार्शवभूमीवर संपन्न झाली. यावेळी पत्रकार बांधवांसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना मधुकर (आबा) म्हणाले कि, जामखेड शहर स्वछ सुंदर करण्यासाठी, जामखेडचा विकास करण्यासाठी सत्तेची गरज आहे. सत्तेतील माणसाच्या पाठीमागे उभे राहण्याची गरज आहे. जामखेड शहरात गुंडागर्दी वाढली आहे ती थांबवली पाहिजे जामखेडला कुठलीही एमआयडीसी किंवा इंडस्ट्री नाही त्यामुळे तरुण बेरोजगार आहेत त्यांच्या हाताला रोजगार मिळाला पाहिजे. यासाठी प्रयत्न केले पाहिजेत मोठमोठे



कॉम्प्लेक्स झाले पाहिजेत त्यामध्ये मॉल, सांस्कृतिक भवन झालं पाहिजे आणि जामखेड बदनाम झालंय असं अजिबात नाही कशानाही शहर बदनाम होत नाही व्यापार पेठ जामखेडची मोठी आहे त्यामुळे नगरपालिकेच्या माध्यमातून सुंदर शहर व स्वछ शहर झालं पाहिजे आणि जामखेड कर म्हणून प्रत्येक नागरिकांनी माझं जामखेडकर म्हणून पाहिलं पाहिजे जामखेडसाठी आता काय तरी करायची वेळ आली आहे आम्ही जेष्ठ नेते म्हणून काम करत आहोत परंतु विकास जामखेडचा झाला नाही आता मात्र जामखेड हरित करायचं असेल तर पर्याय नाही पक्ष जी जबाबदारी माझ्यावर देईल ती मी स्वीकारणार आहे. नगर परिषदेच्या कृषी विभागाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शासकीय योजना उपलब्ध करून देणार आहे. दहा वर्षांपासून शेतकरी योजनांपासून वंचित असून त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी नेहमी प्रयत्न होणार आहे. हिंदू-मुस्लिम समाजात ऐक्य राहावे, शांतता नांदावी हा आमचा विचार आहे. शांतिनाथ महाराज व इमामशहा वली बाबांच्या संजीवन समाधीमुळे जामखेड हे धार्मिक एकतेचे प्रतीक आहे. विद्यार्थीसाठी उच्च दर्जाचे शिक्षण संकुल उभारून विद्यार्थ्यांना चांगल्या संधी उपलब्ध करुन देणार आहे. शैक्षणिक विकास झाला की शहराचा सामाजिक आणि व्यावसायिक स्तर उंचावतो असे देखील प्रा. मधुकर राळेभात यांनी सांगितले.

माझीही पत्नी बीपीएड आहे सुशिक्षित आहे मी पक्षाकडे उमेदवारी मागितली आहे पक्षाने दिली संधी तर त्याच सोन करिन, सभापती प्रा राम शिंदे साहेब यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून आणतील तत्यामुळे विकास आता दूर नाही आपण सर्व जण मिळून जामखेड शहर स्वछ सुंदर हरित कर, असे अवाहन केले आहे.

यावेळी नगरसेवक दिगंबर चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते प्रा. लक्ष्मणराव ढेपे, पवन राळेभात, अमित जाधव, पिंटूशेठ बोरा, गणेश राळेभात, उद्धवराव हुलगुंडे, अशोक गायकवाड, राजू वारे, अॅड अमृत राळेभात, विलास मोरे, वैभव काटकर, सुरज राळेभात, लखन राळेभात आदी मान्यवर उपस्थित होते.

## मालमत्ता कर विभागातील लूट तात्काळ थांबवा : रविराज बोटले

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दिवा प्रभाग समितीतील शास्ती (Penalty) च्या नावाखाली नागरिकांची मोठ्या प्रमाणावर होत असलेली आर्थिक लूट व भ्रष्टाचाराबाबत तात्काळ चौकशी करून सबधित अधिकाऱ्यावर कारवाई करून होणारा आर्थिक भ्रष्टाचार थांबवा यासाठी ऍड रविराज बोटले आक्रमक होत दिवा प्रभाग समितीमधील मालमत्ता कर विभागात सुरु असलेल्या गंभीर अनियमितता व भ्रष्टाचाराकडे लक्ष वेधले. सध्या परिस्थितीत प्रभागातील मालमत्ता कर व हस्तांतरण (Mutation) प्रकरणांमध्ये, सरकारकडून अंतिम आदेश/परिपत्रक स्पष्ट नसल्याचा फायदा उचलत काही कर्मचारी नागरिकांवर शास्ती (Penalty)



लावण्याचे नावाखाली मोठ्या प्रमाणावर पैसे उकळत आहे तसेच असे दिसून येत आहे की-जे नागरिक बेकायदेशीर भ्रष्ट मार्गाने मागील दरवाजातून पैसे देतात, त्यांच्या फाइल्स त्वरित हस्तांतरित केल्या जात आहेत.व जे सामान्य नागरिक अतिरिक्त पैसे देण्यास नकार देतात, त्यांच्या फाइल्स "शास्ती भरली नाही" अशा कारणांवर निकाली काढल्या जात आहेत.

## निंभोरा येथे गीत संगीत व सन्मान सोहळा संपन्न

■ रसिकांनी घेतला मोठ्या प्रमाणात लाभ

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

निंभोरा येथील हिट अँड स्वीट कला ग्रुप तर्फे नुकताच तुमको ना भूल पायेंगे हा गीत संगीत कार्यक्रम व विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान पत्र देऊन गौरव करण्यात आला.या कार्यक्रमाच्या सुरुवातिला सरस्वती माता व स्व. लता मंगेशकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन डॉ. केतकी ताई पाटिल, माजी पं स सभापती सौ. ज्योती ताई बोन्डे, माजी जि प सदस्या सौ. पूनम पाटिल,माजी




नगराध्यक्ष सौ.नंदाबाई लोखंडे, माजी पं स सदस्या सौ.योगिता वानखेडे, सरपंच निर्मलाबाई कोळी,उपसरपंच सौ. रंजना पाटिल,यासह मान्यवरांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी माजी आमदार अरुण दादा पाटिल हे होते.यावेळी

जळगाव जिल्ह्यासह रावेर तालुक्यातील स्वर्गीय माजी खासदार डॉ. गुणवंत राव सरोदे,स्व. माजी खासदार हरिभाऊ जावळे, स्व.माजी विधानसभा अध्यक्ष बाळासाहेब चौधरी, स्व.माजी गृह राज्य मंत्री जे टी दादा महाजन,स्व. प्रल्हाद एकनाथ पाटिल, स्व. शामराव मिठाराम तराळ, स्व. गोदावरी वासुदेव पाटिल, स्व.माजी आमदार बाजीराव नाना पाटिल तसेच निंभोरा व परिसरात ज्यांनी विविध क्षेत्रात कार्य केले अशा मान्यवारांना देखील स्मरण करून त्यांनाही श्रद्धांजली वाहण्यात आले. प्रास्ताविक कार्यक्रम संयोजक राजीव बोरसे यांनी केले. तर उपस्थितीतांचे स्वागत अध्यक्ष प्रल्हाद बोन्डे व डिगंबर चौधरी, दुर्गादास पाटील, नरेंद्र ढाके, सचिन चौधरी यासह गावातील मान्यवरांनी प्रमुख अतिथिंचे स्वागत केले.

## अहिल्यानगर महानगरपालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगरविकास विभागाने मंगळवारी रात्री उशिरा प्रशासकीय सेवेतील मुख्याधिकारी, उपायुक्त व सहायक आयुक्त या संवर्गातील अधिकार्‍यांच्या पदोन्नती व बदल्यांचा आदेश जारी केला. या आदेशानुसार अहिल्यानगर महानगरपालिकेतील वरिष्ठ अधिकार्‍यांच्या बदल्यांमुळे प्रशासकीय पातळीवर मोठी उलथापालथ घडली आहे. महापालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंढे व संतोष टेंगले यांची बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी




नवीन अधिकार्‍यांची नियुक्ती अद्याप झालेली नाही. कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील सहआयुक्त नागेंद्र मुतकेकर यांची महापालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुंढे यांची बदली नाशिक महानगरपालिकेत परिवहन व्यवस्थापक म्हणून करण्यात आली आहे, तर टेंगले यांची नियुक्ती पुणे महानगरपालिकेत सहायक आयुक्त या पदावर झाली आहे. सहायक आयुक्त सपना वसावा यांची तात्पुरत्या स्वरूपात पाथर्डी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे, तर पारनेर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी प्रियांका शिंदे यांची राहुरी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारीपदी तात्पुरत्या नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान, शिर्डी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सतीश दिघे यांची नाशिक महानगर प्रादेशिक प्राधिकरणात सहआयुक्त म्हणून प्रतिनियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यात शिर्डी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार राहणार आहे. याशिवाय, परतूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांची संगमनेर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## जुन्नर शहरातील राहत्या ४५ लाख २४ हजारांची मोठी चोरी

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर पोलीस स्टेशन येथे आसिम अस्लम शेख रा. चंदिपुरा पेठ जुन्नर यांनी फिर्याद दिली की माझ्या राहात्या घरातुन सोन्याची नथ, पैंजण ,हार ,अंगठी , कंगन रोख रक्कम , व चांदीचे दागिने मोठी चोरी झाली आहे .

याबाबत माहिती अशी की , दि. १२ जुलै ते दि . २५ ऑक्टोंबर दरम्यान घरातील रोख रक्कम , सोन व चांदी अंदाजे ४५ लाख २४ हजार रुपये व मुद्देमाल घेऊन आयानुद्दीन वसीम शेख रा. शिपाई मोहल्ला जुन्नर याने माझ्या घरातील खिडकीत ठेवलेल्या चाव्या घेवून घराचे दारवाजाचे कुलूप उघडुन घरात चोरी केली आहे.

जुन्नर पोलीस स्टेशन येथे आबानुद्दीन मुजीबोद्दीन शेख या आरोपी विरोधात गुन्हा रजिस्टर नंबर ३५१/ २०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ [२] ,३०५, [ऐ] ३, [ ५] प्रमाणे दाखल करण्यात आली आहे.

# आघाडीच्या मुलाखतीसाठी प्रकाश पोटे यांच्या उमेदवारीसाठी शक्ती प्रदर्शन

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या रणधुमाळीला वेग आला असून अहिल्यानगर तालुक्यातील महाविकास आघाडीच्या वतीने मुलाखती घेण्यात आल्या यामध्ये तालुक्यातील सहा गट व बारा गणांमध्ये उमेदवारीसाठी इच्छुकांनी जोरदार ताकद दाखवली. यामध्ये चिचोंडी पाटील जिल्हा परिषद गट हा अनुसूचित जातीसाठी (SC Category) आरक्षित असून येथून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते प्रकाश पोटे यांच्या उमेदवारीसाठी मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांनी शक्ती प्रदर्शन केले.



रेल्वे स्टेशन येथील यश ग्रँड हॉटेल येथे झालेल्या मुलाखतीसाठी मोठ्या प्रमाणावर कार्यकर्त्यांची उपस्थिती राहिली.इच्छुक उमेदवारांनी ढोल-ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतिषबाजीत शक्ती प्रदर्शन करत आपले अर्ज दाखल केले.या मुलाखतीसाठी खासदार निलेश लंके,माजी मंत्री प्राजक्त तनपुरे,शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे)जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे,काँग्रेसचे संपत म्हस्के,किसनराव लोटके सर, माधवराव लामखेडे,विक्रम राठोड,बाबासाहेब गुंजाळ, उद्धवराव दुसुंगे यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

सामान्य जनतेच्या समस्या शासन दरबारी नेहमीच मांडणारे, संघर्षातून पुढे आलेले कार्यकर्ते म्हणून प्रकाश पोटे यांच्या यांचा जनसंपर्क प्रचंड असून त्यांना उमेदवारी मिळावी अशी सर्वसामान्यांची मागणी आहे. यावेळी सरपंच शरद पवार आणि प्रकाश पोटे यांनी सांगितले की, सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी अहोरात्र झटणाऱ्या प्रकाश पोटे यांना उमेदवारी मिळाल्यास विकासाचा झंझावात निर्माण होईल.

संघर्षातून आलेल्या व्यक्तीलाच जनतेच्या अडचणीची जाणीव असते.

यावेळी प्रकाश पोटे यांच्याबरोबर चिचोंडे पाटीलचे सरपंच शरद पवार,निंबोडीचे माजी माजी सरपंच बाबुराव दादा बेरड, चंदूकाका पवार, पैलवान भाऊसाहेब धावडे, शिवाजी काका बेरड, शरद चंद्रभान बेरड, राजू बेरड, बापूसाहेब कुलट, जालिंदर वाघ, वैभव कोकाटे, अशोक आवारे, विश्वास बेरड, संकेत बेरड, दत्ता बनसोडे, संदीप खामकर, युवराज हजारे, संदीप बेरड, किसन पोटे, मोहन काळे आदी उपस्थित होते.

# सेंटर फॉर लाईफ सायन्सेस क्लाऊड सोल्यूशन्सचे उद्घाटन

पुणे : (समर्थ गांवकरी)

लाइफ सायन्सेस कंपन्यांसाठी व्यवस्थापन आणि तंत्रज्ञान सल्लागार क्षेत्रातील जागतिक स्तरावरील अग्रणी कंपनी स्वित्झर्लंडमधील टेन्थपिन मॅनेजमेंट कन्सल्टंट्सने आज पुण्यात सेंटर फॉर लाइफ सायन्सेस क्लाऊड सोल्यूशन्स सुरू करण्याची घोषणा केली. या माध्यमातून लाइफ सायन्सेस व्यवसायात परिवर्तन घडवून आणण्यासाठी क्लाऊड आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित सोल्यूशन्सना समर्पित ग्लोबल सेंटर ऑफ एक्सलन्सची



स्थापना करण्यात आली आहे.

या केंद्राचे ध्येय म्हणजे फार्मास्युटिकल, मेडटेक, बायोटेक, हेल्थकेअर, ॲनिमल हेल्थ आणि सीडीएमओसाठी भविष्यासाठी तयार क्लाउड सोल्यूशन्स विकसित करणे आणि आणि उपयोगात आणणे हे या केंद्राचे ध्येय आहे., जेणेकरून त्यांना विशिष्ट अनुपालन आणि जीवन विज्ञान उद्योगाशी संबंधित बारकावे हाताळण्यास मदत होईल, ज्यामुळे नियामक अनुपालन, रिअल-टाइम अंतर्दृष्टी, निर्बाध डेटा एकत्रीकरण आणि जागतिक मूल्य साखळीमध्ये वर्धित सहकार्य शक्य होईल. यामुळे लाईफ सायन्सेस कंपन्यांना प्रगतीला गती मिळेल आणि रुग्णांचे निकाल सुधारता येतील. हे क्लाउड सोल्यूशन्स नवीन थेरपीज, बायोटेक आणि ॲडव्हान्स्ड थेरप्युटिक मेडिसिनल प्रोडक्ट्स, नवीन इंटरनेट ऑफ मेडिकल थिंग्ज (आयओएमटी) तसेच सीडीएमओच्या पुढील पिढीमध्ये विशेषतः प्रासंगिक होत आहेत.

बाणेर येथील या अत्याधुनिक केंद्राचे उद्घाटन टेन्थपिनचे संस्थापक आणि कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री. मायकल श्मिट यांनी केले. यावेळी पार्टनर आणि की अकाउंट डिलिव्हरी लीड स्टेफनी मार्क्स आणि टेन्थपिन इंडियाचे पार्टनर आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. सचिन भुरे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना मायकल श्मिट म्हणाले, "पुण्यात आमच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन हा टेन्थपिनच्या जागतिक विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.



मंचर शहरातील पुरातन आणि पवित्र तपनेश्वर मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दिव्यांचा सोहळा साजरा करण्यात आला. मंदिर परिसरात सुमारे दहा हजार दिव्यांनी उजळलेला नजारा पाहण्यासाठी भाविकांचा जनसमुदाय उसळला होता.

## थोडक्यात बातम्या...



### कोतुळमध्ये त्रिपुरारी पौर्णिमा निमित्त भव्य दीपोत्सव सोहळा संपन्न!

कोतुळ (स. गांवकरी) : अख्ख्या भारतात साजऱ्या होणाऱ्या त्रिपुरारी पौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने अकोले तालुक्यातील कोतुळ येथे अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वात मोठा कार्तिकी त्रिपुरारी पौर्णिमा दीपोत्सव सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला. पांडवकालीन आणि ऐतिहासिक महत्त्व असलेले कोतुळेश्वर मंदिर हे कोतुळ ग्रामाचे तसेच आसपासच्या ४० गावांचे आराध्य दैवत आहे. या मंदिर परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या दिवशी कोतुळसह परिसरातील तसेच बाहेरगावातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. मंदिर परिसरात पारंपरिक भजन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विविध गावांमधील भजनी मंडळींनी टाळ-मृदंगाच्या गजरात प्रभु नामस्मरण करत भक्तिमय वातावरण निर्माण केले. उत्सवाची विशेष परंपरा म्हणून यंदाही नवीन विवाह झालेल्या जोडप्यांच्या हस्ते प्रथम मुळा मातेची आरती करण्यात आली. त्यानंतर शेकडो दीप प्रज्वलन करून मंदिर परिसर तेजोमय करण्यात आला. या सोहळ्यानंतर सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कोतुळ ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नांतून आणि भक्तांच्या सहभागामुळे या वर्षीचा त्रिपुरारी पौर्णिमा दीपोत्सव अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

### कोटक म्युच्युअल फंडातर्फे कोटक रुरल अपॉर्च्युनिटीज फंड

मुंबई (स. गांवकरी) : कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडने (केएमएएमसी) गुंतवणूकदारांसाठी कोटक रुरल अपॉर्च्युनिटीज फंड ही नवीन फंड योजना आणत असल्याची घोषणा केली आहे. मुदतमुक्त स्वरुपातील ही इक्विटी योजना प्रामुख्याने ग्रामीण अर्थव्यवस्था तसेच संबंधित संकल्पनावर आधारलेली आहे. सदर योजना गुंतवणूकदारांसाठी ६ नोव्हेंबर २०२५ ते २० नोव्हेंबर २०२५ पर्यंत सार्वजनिक गुंतवणूकीसाठी खुली राहणार आहे. भारतातील ग्रामीण परिवर्तनाशी संबंधित असलेल्या अथवा ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनाचा फायदा मिळणाऱ्या कंपन्यांचे समभाग आणि समभागाशी संबंधित सिक्युरिटीजमध्ये हा फंड प्रामुख्याने गुंतवणूक करणार आहे. अशा गुंतवणूकीतून दीर्घकालीन भांडवल वृध्दीची निर्मिती, हे या फंडाचे उद्दिष्ट आहे. या फंड योजनेसाठी निफ्टी रुरल इंडेक्स (TRI) हा आधारभूत निर्देशांक राहणार आहे. फंड योजनेच्या शुभारंभप्रसंगी बोलताना कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक निलेश शाह म्हणाले, "ग्रामीण भारत आता फक्त शेतीपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो भारताच्या विकासासाठी खुले झालेले एक नवे दालन आहे. आर्थिक समावेशापासून ते डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि अगदी स्थानिक उत्पादनापर्यंत अशा नानाविध बाबींमुळे ग्रामीण भारत संधी, आकांक्षा आणि धोरणांनी प्रेरित अशा परिवर्तनाचा एक नवीन पैलू ठरला आहे. ग्रामीण भागातील वाढते उत्पन्न आणि ग्राहकपयोगी वस्तूंचा वाढता उपभोग आता भारताच्या ढोबळ अर्थप्रणालीचे अविभाज्य अंग बनले आहे. गुंतवणूकदारांना विकासाच्या या परिवर्तनात सहभागी होण्यास मदत करणे, हा कोटक रुरल अपॉर्च्युनिटीज फंडाचा उद्देश आहे आणि हा उद्देश भारताच्या सर्वसमावेशक आणि संतुलित आर्थिक विकासाच्या प्रवासाशी अतिशय मिळताजुळता आहे." ग्रामीण भारत हा आता केवळ शेतीपुरता मर्यादीत राहिलेला नसून शेतीच्या पलीकडे झपाट्याने विकसित होत चालला आहे.

# सरपंच सेवा संघाचा राज्यस्तरीय पुरस्कार कळसचे सरपंच राजेंद्र गवांदे यांना प्रदान

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

सरपंच सेवा संघ महाराष्ट्र च्या वतीने राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार कळस गावचे सरपंच राजेंद्र गवांदे यांना प्रदान करण्यात आला. माऊली संकुल सभागृह आहील्यानगर मध्ये सरपंच संघटीत चळवळीचे नेतृत्व बाबासाहेब पावसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातुन सरपंच उपस्थित होते. यावेळी पोपटराव सोनवणे, रिपाइंचे राज्य संघटक रमेश शिरकांडे, भाजपचे जिल्हा संयोजक भाऊसाहेब वाकचौरे, कैलास कासार, सावळेराम गायकवाड, कवी अशोक शिंदे, आर्यन गवांदे, रोहिदास ढगे आदी उपस्थित होते. राजेंद्र गवांदे हे रिपाई चे



तालुकाध्यक्ष असून पाच वर्षापूर्वी कळस सारख्या राजकीय दृष्ट्या संवेदनशील गावचे सरपंच पद मिळाले, गावात पदाच्या माध्यमातून गाव अंतर्गत काँक्रीट रस्ते, वीजेची बचत व्हावी या दृष्टीने गावात सौर ऊर्जा पथदिवे, शाळा अंगणवाडीस, सौर पॅनल बसवून कायमस्वरूपी विजेचा प्रश्न सोडविला. दलित वस्ती, कळसेश्वर मंदिर, शाळा परिसरात आरो मशीन प्लॅन्ट बसवून शुद्ध पाण्याचा पुरवठा सुरू केला. डिजिटल शाळा करण्याच्या दृष्टीने प्रत्येक वर्गाला इन्ट्रॅक्टिव्ह बोर्ड बसविण्यात आले. कळस, सुलतानपूर शाळेस किचन शेड बांधले. गाव अंतर्गत प्रत्येक चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविले. गावात सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेच्या दृष्टीने स्टॅंड परिसरात, स्मशानभूमी, दलीत स्मशानभूमी, सुलतानपूर, हनुमाननगर येथे स्वच्छतागृहांची निर्मिती तसेच मोबाईल टॉयलेटची बांधण्यात आले. स्वच्छ गाव सुंदर गाव या संकल्पनेतून गावात सार्वजनिक ठिकाणी कचरा कुंड्या, कचरा पत्रा शेड उभारण्यात आल्या आहेत. व्यक्तिगत व सार्वजनिक ठिकाणी शोषखड्डे सिमेंट टाक्यासहित देण्यात आले. सुलतानपूर मांडवदरा, कळस बु येथे पाण्याच्या टाक्या बांधण्याचे काम सुरू आहे. स्मशानभूमी संरक्षण भीत बांधणे, दलित वस्तीत प्रत्येक घरासाठी सौर दिवे बसविन्यात आले आहेत, हेमाडपंती महादेव मंदिर रस्ता, सुलतानपूर शाळा रस्ता, इंदिरा नगर मधील रस्ता, सुलतानपूर येथील सिरतार वस्तीवर जाण्यासाठी असणारा रस्ता, सुलतानपूर गवांदे वस्ती असे अनेक रस्ते काँक्रीटीकरण करून कायमस्वरूपी रस्त्याचा प्रश्न सोडविला आहे. दलीत स्मशानभूमीत काँक्रीट करण्यात आले आहे. सांगवी-निमगाव रोड चौक, शिर्के वस्ती चौक, सुलतानपूर चौफुली येथे हायमॅक्स बसविण्यात आले आहेत. तलाठी कार्यालय बांधले आहे. सुलतानपूर येथे सभामंडप, नव्याने बुद्ध विहाराची निर्मिती करण्यात आली आहे व त्यात भव्य अशी भगवान बुद्धांच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे. ग्रामपंचायत परिसरात पेव्हर ब्लॉक बसविन्यात आले आहेत. सांडपाण्याचे कायमस्वरूपी निर्मूलन करण्यासाठी बंदिस्त गटार करण्यात आली आहे. गाव अंतर्गत पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन विस्तारिकरण काम केले आहे, गाव अंतर्गत प्रत्येक वस्तीसाठी नळ योजना पूर्ण केली आहे. रमाई आवास योजना, मोदी आवास योजना, शबरी घरकुल योजना, पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून 95% वंचित घटकांना घरकुल दिले. रोजगार हमी योजनेअंतर्गत अनेक पशुपालकांना गोठे बांधून दिले आहेत. गावात नेत्र तपासणी व उपचार शिबिर, सर्व रोग निदान शिबिर, कर्करोग तपासणी, रक्तदान शिबीर, आधार कार्ड कॅम्प, आदी सामाजिक उपक्रम राबविण्यात आले आहेत. तसेच मेरी मिट्टी मेरा देश अभियान अंतर्गत गावात कोल्हार घोटी रोडलगत रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आले आहेत, अगदी टँकर ने पाणी घालून झाड जगविण्यात आले आहेत.

# अहिल्यानगर येथे कवी संमेलन

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

श्री शंभुकलश काव्यसंस्था व सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य या संस्थेचे पहिले राज्यस्तरीय कवी संमेलन अहिल्यानगर येथे रविवार दिनांक ९/११/२०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे, या संमेलनासाठी उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक डॉ श्री संजय बोरुडे, संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक प्रसिद्ध व्याख्याते श्री चंद्रकांत (दादा) वानखेडे तसेच या काव्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक श्री नागेशजी शेलार सर असतील तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक तसेच शब्दगंध साहित्यिक परिषदेचे संस्थापक सचिव श्री सुनील गोसावी, माजी पोलिस अधिकारी कवी श्री सुभाष सोनवणे, ग्रामीण कवी श्री आनंदा साळवे, जेष्ठ कवयित्री रंजनताई बोरा, जेष्ठ कवयित्री सुनिताताई वाळुंज.हे सर्व उपस्थित राहणार आहेत अशी माहिती श्री नवनाथ पोकळे, युवा कवी व संस्थेचे संस्थापक कवी संदिप पाचारणे यांनी दिली आहे. संस्थेचे पहिले राज्यस्तरीय भव्य स्वरुपात कवी संमेलन पार पडणार असून संमेलनाचे ठिकाण, हॉटेल यश पॅलेस, सक्कर चौक अहिल्यानगर, येथे असून छत्रपती श्री संभाजी राजे आणि कवी कलश यांच्या साहित्याचा वारसा सांगून मायमराठीच्या सेवेसाठी सर्व कवींना हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी या भव्य राज्यस्तरीय संमेलनाचे आयोजन केले आहे.

# 'स्वप्नपूर्ती' तर्फे उद्योजक प्रशिक्षण शिबिराचे अनंत घाणे यांच्या हस्ते उद्घाटन!

- ३ दिवसीय कार्यशाळेत ५० नवउद्योजकांचा उत्स्फूर्त सहभाग!

अकोले : (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील कळसुबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्य परिसरातील घाटघर इको सिटी येथे 'स्वप्नपूर्ती सामाजिक संस्था' व वन्यजीव विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय उद्योजक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. दिनांक ३ ते ५ नोव्हेंबर या कालावधीत पार पडलेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन समाजसेवक डॉ. अनंत महादु घाणे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरात एकूण ५०



नवउद्योजकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ग्रामीण भागातील युवक आणि महिलांना स्थानिक पातळीवर उद्योग-धंद्यांच्या संधींची माहिती देऊन स्वावलंबी बनविणे हा या कार्यशाळेचा प्रमुख हेतू होता. उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. अनंत घाणे म्हणाले, "अकोले तालुका पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, स्थानिकांनी पर्यटनाशी संबंधित उद्योग सुरु केल्यास आर्थिक प्रगती साध्य होऊ शकते. त्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संस्थांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे."

या कार्यक्रमादरम्यान डॉ. घाणे यांच्या हस्ते सर्व प्रशिक्षणार्थींना केंद्र शासनाचे उद्यम आधार प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. तीन दिवस चाललेल्या प्रशिक्षणात केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. स्वप्नपूर्ती संस्थेमार्फत सर्व प्रशिक्षणार्थ्यांची मोफत व्यवसाय नोंदणीही करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष प्रा. सचिन काकडे पाटील यांनी सांगितले, "आदिवासी व ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या योजना माहीत नसल्यामुळे अनेकजण विकासापासून वंचित राहतात. स्वप्नपूर्तीच्या माध्यमातून आम्ही अशा शेकडो गावांमध्ये जाऊन नवीन उद्योजक तयार करण्याचा प्रयत्न करत आहोत."

# अपंग मुलांच्या जीवनात बदल घडवून आणूया – त्यांना सक्षम बनवूया : नानजीभाई ठक्कर!

## प्राण फाउंडेशन स्कूल अँड डेव्हलपमेंट सेंटरला नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांची भेट!

ठाणे : (समर्थ गांवकरी)

समाजातील विशेष मुलांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवण्यासाठी शिक्षण आणि कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित करत श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी म्हटले की, "अपंग मुलांना योग्य प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाले तर ते समाजात अर्थपूर्ण जीवन जगू शकतात." श्री. नानजीभाई ठक्कर ठानावाला



यांनी आज ठाण्यातील प्राण फाउंडेशन स्कूल अँड डेव्हलपमेंट सेंटर ला विशेष भेट दिली. या वेळी त्यांच्या सोबत श्री. प्रदीप जैन आणि डॉ. पायल जैन उपस्थित होत्या. या भेटीदरम्यान नानजीभाई ठक्कर यांनी संस्थेच्या कार्याचा सविस्तर आढावा घेतला आणि विशेष मुलांच्या विकासासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, "या संस्था मानसिक, शारीरिक आणि सामाजिक दृष्ट्या अपंग मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहेत. अशा संस्थांचे कार्य समाजाला प्रेरणा देणारे आहे."

बालरोग तज्ज्ञ व विशेष गरज असलेल्या मुलांसाठी कार्यरत असलेल्या डॉ. पायल जैन यांनी या संस्थेची स्थापना केली आहे. त्यांनी गरज ओळखून १ जुलै २०२४ रोजी ठाण्यातील जीबी रोडवरील त्यांच्या क्लिनिकमधून फक्त दोन मुलांसह या उपक्रमाची सुरुवात केली. आज या शाळेने समाजात एक नवीन ध्येय निर्माण केले आहे.

यावेळी श्री. प्रदीप जैन म्हणाले, "श्री. नानजीभाई ठक्कर यांच्या भेटीतून आम्हाला नव्या कल्पना आणि प्रेरणा मिळाली आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आमच्या प्रकल्पाच्या विस्तारासाठी नवे दिशानिर्देश मिळाले आहेत."

नानजीभाई ठक्कर यांनी संस्थेतील विद्यार्थ्यांशी आणि शिक्षकांशी संवाद साधला तसेच भविष्यात या उपक्रमाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. प्राण फाउंडेशन स्कूल अँड डेव्हलपमेंट सेंटर हे ठाण्यातील अपंग मुलांसाठी कार्यरत असलेले एक आगळेवेगळे केंद्र असून येथे मुलांच्या कौशल्य विकास, शिक्षण, थेरपी, आणि समाजातील समावेशकतेसाठी विविध उपक्रम राबवले जातात.

# टिटवाळ्यातील पहिल्या क्लास वन अधिकारी प्रियंका म्हसकर यांचा केला समस्त टिटवाळाकरांनी सन्मान

टिटवाळा : (समर्थ गांवकरी)

कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत असलेले अनंता म्हसकर सर यांची कन्या कु. प्रियंका अश्विनी अनंता म्हसकर हिची नुकत्याच लागलेल्या राज्यसेवा परीक्षेच्या अंतिम निकालात वर्ग १ अधिकारी म्हणून निवड झाली आहे. हा संपूर्ण टिटवाळाकरांसाठी अभिमानाचा क्षण आहे. प्रियंकाच्या यशाने टिटवाळाकरांच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

प्रियंकाच्या यशाच कौतुक करण्यासाठी तिची संपूर्ण टिटवाळा शहरात चारचाकीतून डीजे, लेजीमच्या तालात मिरवणूक काढून कौतुक सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात



पार पडला. यावेळी बहुसंख्य टिटवाळकरांनी उपस्थिती दर्शवित तिचे कौतुक केले.

प्रियंकाच शिक्षण पहिली ते चौथी पर्यंत टिटवाळ्यातीलच राष्ट्रीय विद्यालयामध्ये झाल. त्यापुढील ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण गणेश विद्यालय टिटवाळा येथे झालं असून, ११ वी १२ वी बांदोडकर कॉलेज येथून पूर्ण झाले. १२ व्वी सायन्स ला चांगले गुण मिळविल्याने तिचा एमबीबीएसला नंबर लागूनही स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करायचा हे मनात पक्क असल्याने त्याला पूरक अस क्षेत्र निवडल आणि शासकीय विधी महाविद्यालयातून कायद्याचं शिक्षण पूर्ण केलं. त्यातच कोरोना काळाचा प्रभावी उपयोग करत एमपीएससी च्या अभ्यासावर पकड मजबूत केली. अभ्यासात असणारी हुशारी, चिकाटी, सातत्य आणि जिज्ञासा हे गूण लहानपणापासूनच प्रियंका मध्ये लहानपणापासूनच असल्याने अवघ्या २३ व्या वर्षी तिला हे यश मिळवता आले. तिच्या या प्रवासात शालेय जीवनात राष्ट्रीय विद्यालयाच्या हातणकर मॅडम, गणेश विद्यालयाचे वारघडे सर, तरे सर, बुगडे मॅडम, घावट सर, शेळके सर, घोलप सर, माने मॅडम व कुऱ्हाडे सर यांचे मार्गदर्शन लाभले.

तर पुढे एमपीएससी स्पर्धा परीक्षेच्या संपूर्ण प्रवासात प्रमुख मार्गदर्शक म्हणून टिटवाळ्याचे रहिवासी व मुंबई उच्च न्यायालयात वकील म्हणुन कार्यरत असणारे ॲड.सागर वाकळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.अभ्यासाचे संदर्भ साहित्य ते पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा ते मुलाखत असा संपूर्ण प्रवास कोणताही क्लास न लावता टिटवाळ्यात राहून केवळ सागर वाकळे सरांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला, तिच्या सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने यशस्वी झाल्यावर गुरूंचा चरण स्पर्श करण्यास ती अजिबात विसरली नाही.

या भव्य नागरी सत्कार सोहळ्याची सुरुवात निमकर नाका येथून भव्य विजयी रॅली काढून झाली. पुढे वाजपेयी चौक, टिटवाळा स्टेशन, विवेकानंद चौक ते गणपती मंदिर व नंतर माजी नगरसेवक संतोष तरे निवासस्थान व अशोका बँकवेट हॉल येथे रॅली संपल्यानंतर हा भव्य सोहळा पार पडला. माजी नगरसेवक संतोष तरे यांच्या निवासस्थानी देखील प्रियांकाचे औक्षण करण्यात आले.

या सत्कार सोहळ्यात टिटवाळा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक पंकज गिरी व सागर वाकळे सरांचे आणखी एक शिष्य पोलीस उपनिरीक्षक जयवंत वारा यांनी शुभेच्छा व्यक्त करीत मार्गदर्शन केले. या वेळी उपस्थित अनेक मान्यवरांनी शब्दसुमनांनी व पुष्पगुच्छ देऊन प्रियांकाला शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज शेळके सर यांनी केले. या कार्यक्रमाला माजी नगरसेवक संतोष आप्पा तरे, कल्याण तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक पंकज गिरी, कल्याण डोंबिवली महापालिकेचे 'अ' प्रभाग सहाय्यक आयुक्त जयवंत चौधरी, माजी नगरसेवक सुरेश (तात्या) भोईर, महेश एगडे, राजेश एगडे, मिलिंद सावंत, प्रमोद नांदगावकर, जयवंत बांगर, वैभव खिस्मतराव, रोहीत खिसमतराव, किरण गुजरे, अनिल फड, आनंद जाधव, संदीप नाईक, संदेश लोणे, नितीन सिंग, चंद्रकांत धापटे सर, संतोष शिंगोळे, नाना पवार, हेमंत गायकवाड, आनंद भोईर, महेंद्र हाडवळे, प्रणित दलाल, पत्रकार राजू टपाल, संभाजी मोरे इत्यादींसह शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवर, कल्याण डोंबिवली परिसरातील शिक्षक, विविध आदिवासी संघटना व सहकारी गृहनिर्माण सोसायटी चे पदाधिकारी उपस्थित होते.

# बिबट्याचे माणिकडोह येथे शवविच्छेदन व अंत्यसंस्कार



**मंचर : (समर्थ गांवकरी)**

पिंपरखेड (ता. शिरूर) परिसरात भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या नर बिबट्याला शार्प शूटरकडून ठार करण्यात आल्यानंतर त्याचे शवविच्छेदन माणिकडोह येथील बिबट निवारण केंद्रात बुधवार दिनांक 5 रोजी सायंकाळी करण्यात आले. त्यानंतर अंत्यसंस्कार करण्यात आले.या बिबट्याचे वजन सुमारे ६४ किलो असून वय अंदाजे साडेसहा वर्ष असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले.शवविच्छेदनादरम्यान बिबट्याच्या पोटात कोणतेही अन्न नसल्याचे आढळून आले, म्हणजेच तो उपाशी अवस्थेत होता. या बिबट्याच्या वर्तनावरून तो मानवी वस्तीत शिरल्याचे कारण अन्नाच्या शोधाशी संबंधित असल्याचे प्राथमिक तपासात दिसून आले.

शवविच्छेदनाची प्रक्रिया वनवैद्य डॉ. शहर परदेशी यांनी पूर्ण केली. त्यानंतर जुन्नर वनविभागाचे उपवनसंरक्षक प्रशांत खाडे, सहाय्यक उपवनसंरक्षक स्मिता राजहंस व इतर अधिकारी यांच्या उपस्थितीत माणिकडोह केंद्रात या बिबट्याचे अंत्यसंस्कार करण्यात आले.अलीकडेच पिंपरखेड व आसपासच्या गावांमध्ये बिबट्याच्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई महत्त्वाची ठरली आहे. या घटनेनंतर परिसरात वनविभागाने दक्षता वाढवली असून नागरिकांनी संयम बाळगावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



मंचर : श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त बुधवारी (दि. ५) भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला. सकाळपासूनच लाखो भाविकांनी पवित्र शिवलिंगाचे दर्शन घेतले. दुपारनंतर गाभाऱ्यातील दर्शन बंद करून शिवलिंगावर पारंपरिक पोशाख चढविण्यात आला. या वेळी मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट, विद्युतरोषणाई व लेझर शोने वातावरण अधिकच उत्साही झाले.

## थोडक्यात बातम्या...

### संगमनेर तालुक्यातील गावांसाठी तब्बल ७६ लाख रुपयांचा निधी !



संगमनेर (स. गांवकरी) : तालुक्यातील ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने नागरिकांना दर्जेदार पायाभूत सुविधा आणि वाहतूक सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आमदार सत्यजीत तांबे यांच्या माध्यमातून वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत संगमनेर तालुक्यातील विविध गावांमधील रस्त्यांच्या कामांसाठी तब्बल ७६ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यामध्ये संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापुर, शिंदोडी, शेडगाव, चिंचपूर, घुलेवाडी, जांबूत, दरेवाडी, रणखांब, वेल्हाळे, साकुर, बिरेवाडी, पिंपरणे, कौठे मलकापूर, तिगाव या गावांचा समावेश आहे. यामुळे ग्रामीण नागरिकांना दररोजच्या प्रवासातील अडचणींवर मात करता येईल, शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतुकीत सुलभता मिळेल आणि विद्यार्थ्यांना शाळा-कॉलेजपर्यंत सहज पोहोचता येईल. आणि ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यास मोठी चालना मिळेल.

संगमनेर तालुक्यातील प्रत्येक वस्तीपर्यंत पायाभूत सुविधा पोहोचवणे हे माझे ध्येय आहे. ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी घेतलेला प्रत्येक निर्णय हा जनतेच्या हितासाठीच आहे. **- आमदार सत्यजीत तांबे**

### 'आयसीएआय'तर्फे शनिवारी सीए विद्यार्थ्यांची राष्ट्रीय परिषद



■ माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते उद्घाटन; शनिवार व रविवार दोन दिवस परिषद

पुणे (स. गांवकरी) : दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) अभ्यास मंडळाच्या वतीने, 'आयसीएआय' पुणे शाखा व 'विकासा' शाखेच्या सहकार्याने सीए विद्यार्थ्यांसाठी कर्वेनगर येथील महालक्ष्मी लॉन्समध्ये येत्या ८ व ९ नोव्हेंबर २०२५ या दोन दिवशी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. 'अग्रिया: लिडिंग माईंड, शेपिंग फ्युचर' या संकल्पनेवरील या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन माजी केंद्रीय शिक्षण मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते शनिवारी (ता. ८) सकाळी ९.३० वाजता होणार आहे, अशी माहिती 'आयसीएआय' पुणे शाखेचे अध्यक्ष सीए सचिन मिणियार व परिषदेच्या समन्वयिका सीए प्रज्ञा बंब यांनी दिली. सीए सचिन मिणियार म्हणाले, "सीए विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ही परिषद अतिशय महत्वाची असते. देशभरातून २००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला आहे. विविध विषयांवर दोन दिवस तज्ज्ञांची मार्गदर्शन सत्रे होणार आहेत. ज्ञानवृद्धी, कौशल्य विकास यासह करिअरच्या संधी आणि चर्चासत्राचा यामध्ये समावेश आहे. 'आयसीएआय'च्या अभ्यास मंडळाचे चेअरमन सीए रोहित रुवातीया, व्हाईस चेअरमन सीए संजीब संघी, केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे."

# रायतेवाडी येथे मा मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते स्वागत कमानीचे लोकार्पण

**स्वागत कमानीमुळे गावाच्या वैभवात भर माजी मंत्री बाळासाहेब थोरात**



**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना नेहमी ऊस उत्पादक ,शेतकरी आणि सभासद यांचे हिताचे निर्णय घेत असून कारखान्यांने कायम विकास कामात योगदान दिले आहे . रायतेवाडी गावाने एकजुटीतून कायम विकासाला प्राधान्य दिले आहे .नवीन कमानीमुळे गावच्या वैभवात भर पडली असल्याचेप्रतिपादन लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

तालुक्यातील रायते या गावात आदिशक्ती मुक्ताई माता मंदिराजवळ सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याकडून नागरिकांच्या आग्रहास्तव स्वागत कमान देण्यात आली. तिचे लोकार्पण माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात व गावकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी समवेत एड. नानासाहेब शिंदे, रामहरी कातोरे, रमेश भाऊ गुंजाळ , बाळासाहेब राहणे ,संपत खर्डे , भाऊसाहेब खर्डे ,पांडुरंग नवले, महादू खर्डे ,नानासाहेब खर्डे, रमेश गफले, सुरज पानसरे ,सुदाम खर्डे , राहुल शिरतार ,शशिकांत कडलग ,सुरज खर्डे , कलीम पिरजडे, चेतन मेने आदी सह युवक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, रायतेवाडी गावात सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने एक स्वागत कमान हवी अशी मागणी गेल्या कित्येक दिवसांपासून ग्रामस्थांची होती. नवरात्र उत्सवामध्ये आदिशक्ती मुक्ताई माता देवीचा कार्यक्रम येथे मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. भाविकांसाठी दररोज किर्तन भजन व शेवटी महाप्रसाद या प्रकारे कार्यक्रमाचे नियोजन नवरात्र कमिटी व युवकांच्या वतीने होत असते. ही गावची धार्मिक बाब कौतुकास्पद आहे. थोरात कारखान्याने तालुक्याच्या विकासात कायम महत्त्वाची भूमिका मांडली आहे. अडचणीच्या काळात शेतकऱ्यांना मदत कारखाना नेहमीच करत असतो. नवीन स्वागत कमानीमुळे गावच्या वैभवात भर पडली असल्याचे ते यावेळी म्हणाले. यावेळी नागरिक, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मिलेनियम स्कूल, विद्या व्हॅलीचा विजयी सिलसिला कायम

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मिलेनियम नॅशनल स्कूलने त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांशी काहीही बरोबरी केली नाही, तर विद्या व्हॅलीने मैदानावर हातमिळवणी करून आपली ताकद दाखवली. परंतु डॉ. (मिसेस) एरिन एन. नगरवाला डे स्कूलने गुरुवारी येथील लोयोला एच.एस. ग्राउंड, पाषाण येथे टाटा ऑटोकॉम्प द्वारा प्रायोजित लोयोला फुटबॉल कप २०२५ च्या तिसऱ्या दिवशी विद्या व्हॅलीचा पराभव करून त्यांना क्लीन स्वीपपासून रोखले. अ गटामध्ये अर्चित पाटोळेच्या (३४', ६०', ६०+१') सर्वोत्तम कामगिरीच्या जोरावर मिलेनियम नॅशनल स्कूलने १६ वर्षांखालील विभागात एसएसपीएमएस बोर्डिंग स्कूलवर ५-० असा सहज विजय मिळवला. इतर दोन गोल आयुष चवते (४९') आणि अर्जुन कवितके (५४') यांनी केले. १४ वर्षांखालील गटात, मिलेनियम नॅशनल स्कूलने अर्जुन गुंड (२६', ४४') आणि नील जोशी (४') यांनी केलेल्या सामन्यातील सुरुवातीच्या गोलमुळे अ गटातील सामन्यात एसएसपीएमएस बोर्डिंग स्कूलवर ३-० अशी मात केली. नंतर १२ वर्षांखालील गटात, मिलेनियम नॅशनल स्कूल आणि बिशप्स, कॅम्प यांच्यात (अ गट) गोलशून्य बरोबरी राहिली.

सायंकाळी सत्रात, विद्या व्हॅलीने गट-ब सामन्यात डॉ. (श्रीमती) एरिन एन नगरवाला डे स्कूलविरुद्ध २-० असा विजय मिळवला. त्याच १२ वर्षांखालील गटात एकांक ओझा (१२', १५') यांनी केलेल्या दोन गोलमुळे डॉ. (श्रीमती) एरिन एन नगरवाला डे स्कूलने पूर्ण गुण मिळवले. संध्याकाळी मध्यरात्री, विद्या व्हॅली स्कूलच्या १४ वर्षांखालील संघाने गट-ब मध्ये डॉ. (मिसेस) एरिन एन. नगरवाला डे स्कूलचा ५-० असा पराभव केला.

गुंतागुंतीच्या मुत्ररोग समस्येवर एस हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी वापरलेल्या नवीन

# रोबोटिक सर्जिकल तंत्राची आंतरराष्ट्रीय नियतकालिकेत नोंद

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

ज्येष्ठ मुत्ररोग तज्ञ व एस हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ.सुरेश पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली मुत्ररोग तज्ञ डॉ.गुरूराज पडसलगी,डॉ.सचिन भुजबळ, डॉ.सौरभ उपलेंचवार यांनी नुकतेच मुत्रपिंडासंबंधी गुंतागुंतीच्या परिस्थितीवर रोबोटिकच्या साहाय्याने लॅप्रोस्कोपिक पायलोलिथुमी आणि बक्कल म्युकोसल ग्राफ्ट (बीएमजी) या एकाच वेळी दोन प्रक्रिया केल्या. हे नवीन तंत्र गुंतागुंतीच्या मुत्रपिंडाच्या स्थितीत रोबोटिक तंत्रज्ञानाच्या वापरामध्ये एक महत्त्वाचा टप्पा आहे. शास्त्रीय नियतकालिकेमध्ये प्रकाशित होणारी अशा प्रकारची जगातील ही पहिलीच रोबोटिक शस्त्रक्रिया आहे.याबाबतचा निबंध नुकताच जर्नल ऑफ रोबोटिक सर्जरी जर्मनी येथे प्रकाशित झाला.

याबाबत माहिती देताना एस हॉस्पिटल,एरंडवणे पुणे चे अध्यक्ष प्रा.डॉ.सुरेश पाटणकर म्हणाले की, काही काळापूर्वी आमच्या रूग्णालयात पोटदुखीची तक्रार घेऊन 41 वर्षीय पुरूष रूग्ण आला होता. निदानामध्ये त्यांचे मुत्रपिंड शरीरातील सामान्य नैसर्गिक ठिकाणीऐवजी ओटीपोटात असल्याचे आढळून आले. या स्थितीला एक्टोपिक किडनी असे म्हणतात आणि ही एक दुर्मिळ जन्मजात स्थिती असते. त्याशिवाय त्याला अनेक मुतखडे झाल्याचे आढळले आणि मुत्रपिंड व मुत्रवाहिनी जोडणाऱ्या भागात अडथळा निर्माण झाला होता. साधारणत: अशा असामान्य शरीर रचना आणि गुंतागुंतीचा धोका असलेल्या स्थितींवर उपचार करणे अत्यंत कठिण असते.

एक्टोपिक किडनी ही या दुर्मिळ जन्मजात स्थितीमध्ये मुत्रपिंड व मुत्रवाहिनी जोडणाऱ्या भागात अडथळे तर असू शकतात परंतु मुतखडे सहसा आढळत नाहीत. असामान्य रचना,छोटी मुत्रवाहिनी,रक्तवाहिन्यांची गुंतागुंतीची स्थिती आणि नजिकचा आतड्यांचा परिसर यामुळे कुठलीही प्रक्रिया करणे आव्हानात्मक असते.लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया ही खुल्या शस्त्रक्रियेपेक्षा सुरक्षित मानली जाते आणि रूग्ण लवकर बरा होतो.मात्र तांत्रिकदृष्ट्या अशा स्थितीत ही प्रक्रिया कठिण आणि शल्यचिकित्सकांसाठी जास्त वेळ लागणारी ठरू शकते.

ज्या रूग्णांना आधीपासून मुतखड्यांचा त्रास आहे,त्यांच्या मुत्रपिंडामध्ये व्रण आणि दाह त्रासदायक ठरू शकते.तसेच उतींना नाजूक बनू शकतो.त्यामुळे अशा प्रकारच्या स्थितीत टाके घातल्यामुळे या उतींना नुकसान पोहचू शकतात आणि रक्तस्त्राव,संसर्ग आणि इतर गुंतागुंत होण्याचा धोका वाढू शकतो. याआधीच्या वैद्यकीय मार्गदर्शक तत्त्वांनुसार अशी शस्त्रक्रिया दोन टप्प्यांत करण्याची शिफारस आहे,मात्र रोबोटिक तंत्रज्ञानामुळे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया देखील सुरक्षित,अधिक कार्यक्षम आणि रूग्ण व शल्यचिकित्सकांसाठी कमी तणाव निर्माण करणाऱ्या झाल्या आहेत.

एस हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या टीमने रोबोटिक शस्त्रक्रिया करायचे ठरविले,असे डॉ.पाटणकर म्हणाले, रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणाली वापरून मुतखडा काढण्याची आणि मुत्रपिंडातील बिघाड दुरूस्त करण्याची प्रक्रिया आम्हाला अचूकतेने एकाच वेळेस करता आली. मात्र अनेक मुतखडे आणि मुत्रमार्गाला याआधीच झालेल्या नुकसानामुळे ही प्रक्रिया आव्हानात्मक होती. अशा प्रकारची गुंतागुंतीची स्थिती हाताळण्यासाठी कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे नाहीत. मुतखडे काढण्याबरोबरच मुत्रपिंड आणि मुत्रवाहिका जिथे मिळते त्या भागात आकुंचन आणि कडकपणामुळे निर्माण झालेला अडथळा काढून टाकण्यासाठी तोंडातील गालाच्या आतील त्वचेचा थोडासा भाग काढून तिथे बसविण्यात आला.

# पुणे ग्रोथ कॉरडॉर : पायाभूत सुविधा, गुंतवणूक आणि इनोव्हेशनचे नवे केंद्र

**आगामी विमानतळ, एमआयडीसी आयटी पार्क आणि रिंग रोड प्रकल्पांसह पुरंदर करणार कनेक्टिव्हिटीची नवी व्याख्या, पुणे ग्रोथ कॉरिडॉरसाठी ठरणार उत्प्रेरक**

पुरंदर परिसरात नवीन विमानतळ, आयटी हब आणि आधुनिक रिंग रोड हे तीनही प्रकल्प एकत्र येत असल्याने पुणे ग्रोथ कॉरिडॉर भारतातील सर्वाधिक गतिमान विकासगाथांपैकी एक होऊ घातला आहे. यातून केवळ पुण्याचा विस्तार तर होणारच आहे, त्याचप्रमाणे पुढील अनेक दशकांसाठी रोजगार, गुंतवणूक आणि कनेक्टिव्हिटीला चालना देणारे एक नवे शहरी केंद्र आकाराला येत असल्याचा संकेत मिळत आहे.

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे ग्रोथ कॉरिडॉर हा पायाभूत सुविधा, उद्योग आणि गुंतवणूक यांच्या एकत्रित विकासामुळे पश्चिम भारतातील सर्वाधिक आशादायी प्रगत पट्ट्यांपैकी एक म्हणून वेगाने प्रगती करत आहे. प्रस्तावित पुरंदर विमानतळ, एमआयडीसी आयटी पार्क आणि पुणे रिंग रोड या तीन महत्त्वाच्या प्रकल्पांच्या माध्यमातून या कॉरिडॉरमुळे जाधववाडी, सासवड, जेजुरी, वडकी आणि हडपसर अॅनेक्स यांसारखी प्रमुख आर्थिक केंद्रांना परस्परांशी जोडली गेली आहेत. वाढलेली कनेक्टिव्हिटी, रोजगारातील संधी आणि रिअल इस्टेटची वाढती मागणी यामुळे हा कॉरिडॉर गुंतवणूकदार आणि गृहखरेदीदारांसाठी नजीकच्या भविष्यातील महत्त्वाचे ठिकाण ठरणार आहे. पुढील काही वर्षांत हा कॉरिडॉर म्हणजे विस्तारीत पुण्याचा भाग असेलच, त्याचप्रमाणे नवकल्पना, आधुनिक सुविधा आणि उत्तम राहणीमान यांचा सांगड घालण्यात आलेला एक नवीन शहरी पट्टा तयार होणार आहे.

**पुरंदर विमानतळ: विकासाचे नवे प्रवेशद्वार :** लवकरच उभारण्यात येणारा पुरंदर विमानतळ हा या परिसरातील कनेक्टिव्हिटी वाढवण्याच्या दृष्टीने एक मोठा टप्पा मानला जात आहे. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरील वाढता ताण कमी करण्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या या विमानतळामुळे देशांतर्गत प्रवास अधिक सुलभ होईलच, तसेच थेट आंतरराष्ट्रीय उड्डाणांचाही मार्ग मोकळा होईल. याशिवाय हा विमानतळ कार्गो हब म्हणूनही विकसित करण्याचे नियोजन असून, पश्चिम भारतातील आर्थिक आणि लॉजिस्टिक केंद्र म्हणून पुण्याचे महत्त्व अधिक वाढेल. या सुधारित कनेक्टिव्हिटीमुळे रहिवासी आणि व्यवसायांना जलद प्रवास, अधिक सोयी आणि व्यापाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील.

**एमआयडीसी आयटी पार्क: पुण्याच्या तंत्रज्ञान क्षेत्राचा विस्तार**

विमानतळ प्रकल्पाला पूरक म्हणून राज्य सरकारने दिवे, चांबळी, कोडीत आणि आसपासच्या गावांमधील सुमारे 1,500 एकर शासकीय जमिनीवर मोठ्या प्रमाणावर एमआयडीसी आयटी पार्क विकसित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या उपक्रमामुळे हिंजवडी आयटी पार्कवरील शहराचे अवलंबित्व कमी होऊन, प्रस्तावित विमानतळाच्या जवळच तंत्रज्ञान आणि सेवा क्षेत्रातील नवीन रोजगार संधी निर्माण होतील अशी अपेक्षा आहे.

विमानतळ आणि एमआयडीसी आयटी पार्क यांचा परस्परपूरक विकास गुंतवणुकीसाठी एक मोठे आकर्षण केंद्र ठरणार आहे. या दोन्ही प्रकल्पांच्या संयोगामुळे जागतिक कंपन्या, स्टार्टअप्स आणि स्थानिक व्यवसायांना प्रोत्साहन देणारी एक सक्षम परिसंस्था तयार होईल, ज्याचा थेट फायदा रहिवाशांनाही मिळेल. यामुळे तंत्रज्ञान केंद्र म्हणून पुरंदर परिसर वेगाने विकसित होईल आणि पुणे ग्रोथ कॉरिडॉरचा महत्त्वाचा आधारस्तंभ बनेल. परिणामी, बहुराष्ट्रीय कंपन्या आणि कुशल व्यावसायिकांकडून या ठिकाणाला प्राधान्य मिळेल.

**पुणे रिंग रोड: विकासाच्या दिशांची जोडणी**

याचबरोबर पुणे रिंग रोड हा 170 किमी लांबीचा महत्वाकांक्षी प्रकल्पही जलद गतीने आकार घेत आहे. मोठ्या प्रमाणावर जमीन संपादन पूर्ण झाले असून, अनेक भागांमध्ये काम सुरू झाले आहे. हा रिंग रोड सुरू झाल्यानंतर पुण्याभोवतीचे प्रमुख महामार्ग, औद्योगिक क्षेत्रे आणि निवासी पट्टे एकमेकांशी सुलभतेने जोडले जातील. शहराच्या बाह्य भागांमधील प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होईल आणि जाधववाडी, वडकी, फुरसुंगी, हडपसर आणि वाघोलीसारख्या नव्याने उदयास येणाऱ्या परिसरांपर्यंत सहज व जलद पोहोचता येईल.

या सुधारित कनेक्टिव्हिटीमुळे पूर्वी शहराच्या सीमेवरील भागात गणल्या जाणाऱ्या परिसरांमध्ये राहणीमानाची पातळी उंचावेल आणि शहरी पायाभूत सुविधांचा विस्तार अधिक वेगाने होईल. रिंग रोड, आगामी विमानतळ आणि एमआयडीसी आयटी पार्क यांच्या एकत्रित परिणामामुळे पुरंदर हा पश्चिम भारतातील सर्वाधिक मोक्याच्या ठिकाणांना जोडलेला प्रदेश म्हणून उदयास येत आहे.

या महत्त्वाच्या प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदार आणि घरखरेदीदार या दोघांचाही उत्साह वेगाने वाढलेला दिसतो. जाधववाडी, सासवड, जेजुरी आणि हडपसर अॅनेक्स यांसारख्या भागांना वाढलेल्या कनेक्टिव्हिटीचा थेट लाभ मिळणार आहे. मागील तीन वर्षांत या परिसरांतील जमिनींचे दर सुमारे 20–25% ने वाढले असून, तज्ज्ञांच्या मते पायाभूत सुविधा पूर्णत्वाच्या टप्प्याकडे जात असताना या वाढीचा वेग अधिक वाढण्याची शक्यता आहे.

विकासाबाबत प्रतिक्रिया देताना शापूरजी पालनजी रिअल इस्टेटचे सीईओ श्री. सुमित सप्रू म्हणाले :"पायाभूत सुविधा हा कायमच आर्थिक प्रगतीचा पाया राहिला आहे. पुरंदर परिसरात विमानतळ, एमआयडीसी आयटी पार्क आणि रिंग रोड विकसित होत असल्याने पुणे ग्रोथ कॉरिडॉर वेगाने आकार घेत आहे. हा नोड पुणे आणि आसपासच्या शहरांसाठी कनेक्टिव्हिटी आणि संधींची नवी परिभाषा ठरू शकतो. या कॉरिडॉरमुळे जाधववाडी, हडपसर अॅनेक्स आणि जेजुरी हे भाग प्रचंड क्षमता असलेली गुंतवणूक केंद्रे होणार आहेत,

